
माणूस

शनिवार । १६ ऑगस्ट १९८० एक रुपया

# शौर्यगाथा की निरर्थक बलिदान?




स्वातंत्र्यदिनानिमित्त
एका स्वातंत्र्यपर्वाचा
–चापेकर–रँड पर्वाचा
चित्रपटाच्या अनुषंगाने
घेतलेला शोध

पृष्ठ....५

शिवाय : खैबरनामा लेखांक दुसरा पृष्ठ....९

## विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

# विरोधकांची पकड : मंत्र्यांचा नवखेपणा

विनय सहस्रबुद्धे

सुहाव्या महाराष्ट्र विधानसभेच्या चाळीस दिवसाच्या पहिल्या अधिवेशनाचे गेल्या शुक्रवारी सूप वाजले. विधिमंडळाच्या वार्षिक वेळापत्रकानुसार पावसाळी अधिवेशनातच सत्तापालट होण्याचा हा दुसरा प्रसंग होता. दोन वर्षांपूर्वी बंडाचा झेंडा उभारुन पावसाळी अधिवेशनातच ज्यांनी मुख्यमंत्रिपद मिळविले व गेल्या फेब्रुवारी-पर्यंत आपल्याकडे राखले ते शरद पवार या अधिवेशनात प्रथमच विरोधी पक्ष-नेत्याची भूमिका बजावीत होते. शिवाय जवळजवळ गेली चार वर्षे राज्याच्या राजकारणात सक्रिय नसलेले बॅ. अब्दुल रहमान अंतुले मुख्यमंत्री आणि पर्यायाने सभागृहाचे नेते म्हणून कामगिरी बजावणार होते. या दोन्ही वैशिष्ट्यांमुळे राज्यविधानसभेच्या गेल्या अधिवेशनाबद्दल सुरुवातीपासूनच उत्सुकता होती. त्यातच एकीकडे मातब्बर व अनुभवसपन्न नेत्यांचा विरोधी पक्ष तर दुसरीकडे नवखे अननुभवी मंत्री आणि बलाढ्य बहुमताचा सत्ताधारी पक्ष यांच्यातील वैधानिक सामना किती आणि कसा रंगणार याबद्दलही निरीक्षकाना कुतूहल होते.

या सर्व पार्श्वभूमीवर चाळीस दिवसाच्या या अधिवेशनानंतर काही ठळक बाबी सहजपणे नजरेसमोर येतात. राज्यविधानसभेत जवळजवळ दोनतृतियांश बहुमत असलेल्या सत्ताधारी इंदिरा कॉंग्रेसपक्षाने वैधानिक कामकाज-कौशल्याच्या संदर्भात या अधिवेशनात आपली दिवाळखोरीच एक प्रकारे दाखवून दिली आहे. संख्येच्या दृष्टीने बलाढ्य असलेला सत्ताधारी पक्ष गुणवत्तेच्या संदर्भात इतका दुबळा निघण्याचे महाराष्ट्र विधानसभेतील बहुधा हे पहिलेच उदाहरण असावे. संघटित आणि गुणसंपन्न विरोधी पक्षाचा विधिमंडळाच्या कामकाजावरील वरचष्मा हे या अधिवेशनाने लक्षात आणून दिलेले आणखी एक वैशिष्टय. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदर्भात काहीशी अशीच स्थिती लोकसभेतही आहे; पण लोकसभेत विरोधक साख्यिकदृष्टया खूपच दुर्बळ आहेत. उलट मुबईच्या विधानसभेत मात्र संघटित विरोधी पक्षाची ताकद नजरेत भरण्याजोगी आहे. फार काय पण सत्ताधारी पक्षातील तीसचाळीस आमदारानीच केवळ, शरद पवारांचा आदर्श समोर ठेवून पक्षांतर करायचे म्हटले तर इदिरा कॉंग्रेसच्या हातून सत्ता जाऊ शकते अशी एकूण स्थिती आहे. (राज्यविधानसभेतील ताजी पक्षस्थिती : इंदिरा कॉंग्रेस १९२, अर्स कॉंग्रेस–५०, जनता (जे. पी) १६, भारतीय जनता पक्ष १४, शे. का. प. ९, मार्क्सवादी कम्युनिस्ट २, कम्युनिस्ट २, इतर ३.

दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे लोकसभेतील इंदिरा कॉंग्रेसकडे तुलनेने अनुभवी व्यक्तीची संख्या अधिक आहे. शिवाय राज्य विधानसभेतील इंदिरा कॉंग्रेसपक्ष गटबाजीने पोखरलेला आहे. त्यामुळे इंदिरा गाधीच्या प्रभावामुळे का होईना; पण लोकसभेत प्रसंगानुरूप अनुभवाला येणाऱ्या एकसंघतेचा अभाव हीसुद्धा विधिमडळ इंदिरा कॉंग्रेसच्या संदर्भात एक नोदणीय गोष्ट आहे.

जाणवणाऱ्या नेतृत्वाचा अभाव ही इंदिरा कॉंग्रेसच्या चाळीस दिवसाच्या वैधानिक कामगिरीनतर लक्षात आलेली आणखी एक बाब रीतीनुसार, मुख्यमंत्री झालेले बॅ. अ. आर. अंतुले हे सभागृहाचे नेते आहेत; पण काही अपवादात्मक प्रसंग सोडले तर नेतृत्वाची चमक दाखविण्याच्या अनेक संधी मुख्यमंत्र्यानी दवडल्या, असे म्हणावे लागेल. सदनाचे कामकाज नीटपणे चालावे म्हणून सभापतीना मदत करणारा, आपल्याच पक्षा-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : अकरावा

१६ ऑगस्ट १९८०

किमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

तील अतिउत्साही मंडळींना आवर घालणारा, विरोधकांवर वैधानिक मुद्द्यांच्या आधारे तुटून पडणारा आणि मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांना संकटकाळी सावरणारा असा सभागृहाचा नेता असावा लागतो. मुख्य म्हणजे हे सगळे करायचे तर सभागृहाच्या नेत्याने अधिकाधिक वेळ सभागृहात हजर रहाणे आवश्यक असते. कारणे काहीही असोत, पण बॅ. अंतुले यांनी या महत्त्वाच्या बाबीकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसत नाही. विशेषतः प्रश्नोत्तराच्या तासाला अनेक मंत्र्यांची त्रेधा-तिरपिट उडत असताना, विशेषतः धोरणात्मक मुद्द्यावर द्यावयाच्या उत्तरांच्या वेळी, मुख्यमंत्र्यांचे सहाय्य अपेक्षित होते; पण अशा अनेक प्रसंगी मुख्यमंत्री सभागृहात नसायचे व अनेक मंत्री व राज्यमंत्री असहाय स्थितीत विरोधकांच्या प्रश्नांचा भडिमार सहन करायचे.

## मंत्र्यांची अनुपस्थिती

अन्य मंत्र्यांना सावरण्याचे राहू द्या; पण निदान स्वतःकडे असलेल्या गृह व सामान्य प्रशासनखात्याच्या संदर्भात उत्तरे वा निवेदने देण्यासाठी तरी मुख्यमंत्र्यांनी सभागृहात रहाणे, त्यांचे नेतृत्व जाणवण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरले असते; परंतु दुर्दैवाने हेही फारसे व्यवस्थितपणे घडल्याचे दिसत नाही. लक्षवेधी सूचनांवरील बहुसंख्य निवेदने गृहराज्यमंत्री अभयसिंहराजे भोसले यांनी केली तर शेवटच्या काही दिवसांत मुख्यमंत्र्यांशी संबंधित विषयांची उत्तरे, मुख्यमंत्र्यांच्या विनंतीवरून अर्थमंत्री रामराव आदिक यांनी दिली. मंत्रिमंडळाचे काम संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वावर चालत असल्याने असे घडण्यात विशेष आक्षेपार्ह जरी काही नसले तरी सर्वसाधारण औचित्याच्या दृष्टीने हे योग्य नाही.

सदनाचे कामकाज व्यवस्थित चालण्याच्या संदर्भातही मुख्यमंत्र्यांना निर्णायक कामगिरी बजावता आली असती. गेल्या चाळीस दिवसांच्या विधिमंडळाच्या कामकाजात किमान सात-आठ वेळा तरी या ना त्या निमित्ताने कोणत्या ना कोणत्या मंत्र्यावर सभागृहात माफी मागण्याचा वा दिलगिरी व्यक्त करण्याचा प्रसंग उद्भवला. ही बाब कोणत्याही सरकारला शोभादायक नाही. अनेक प्रकरणांवर अध्यक्षांनी दिलेल्या मुदतीत निवेदने सादर करता न आल्याने मंत्र्यांना दिलगिरी व्यक्त करावी लागली. वस्तुतः सुरुवातीला एक-दोनदा असा प्रसंग आल्यानंतर मुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांनी अधिक जागरूक राहून निवेदने वेळेवर देण्याचा प्रयत्न करायला हवा होता. बहुसंख्य मंत्री नवे व अननुभवी म्हणून कदाचित हे घडले असावे असे गृहीत धरले तरी मंत्र्यांना सहाय्य करणारे डझनभर अधिकारी काय करतात, हा प्रश्न उरतोच. निवेदनाच्या वेळी वा लक्षवेधी किंवा हक्कभंग सूचनांच्या वेळी संबंधित मंत्री सभागृहात नसण्याचे प्रसंगही वारंवार घडले. असे प्रसंग यापूर्वी घडतच नव्हते असे नाही; पण या वेळी अवघ्या चाळीस दिवसातच असे प्रसंग घडण्याचे प्रमाण विशेष चिंताजनक आहे. जागरूक विरोधकांनी अशा अनेक प्रसंगी संबंधित मंत्र्याकडून स्पष्टीकरण मागितले व त्यांनी ते दिलेही; पण त्या निमित्ताने सरकार सभागृहाच्या कामकाजाकडे कोणत्या दृष्टीने पाहते हेच स्पष्ट झाले. अशा अनेक प्रसंगात खुद्द मुख्यमंत्र्यांनीही 'आपण एका बैठकीत गुतलो असल्याने वेळेवर हजर राहू शकलो नाही,' इ. आशयाची स्पष्टीकरणे दिली आहेत; पण अखेर 'बूंद से गयी सो हौद से नही आती,' हेच खरे ! — पंधरा दिवसांपूर्वी इंदिरा कांग्रेसच्या मोर्चाच्या संदर्भात आदल्या दिवशीच्या गदारोळानंतर दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करून सभागृहाच्या सदस्यांना संपूर्ण संरक्षण देण्याचे स्पष्ट आश्वासन दिले व सभागृहावर छाप टाकणारे चांगले भाषण केले; पण जे दुसऱ्या दिवशी झाले ते आदल्या दिवशीच केले असते तर मुख्यमंत्र्यांची जागरूकता व तत्परताही दिसून आली असती. विधिमंडळाच्या शेवटच्या आठवड्यातही विधानसभेत असाच गोंधळ झाला व तेव्हा समयोचित निवेदन करण्याची तत्परता मुख्यमंत्र्यांनी दाखविली. मात्र या वेळी विरोधक ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते व त्यामुळे मुख्यमंत्र्यांनाही 'मी नमते घेणार नाही' अशी भूमिका घ्यावी लागली ! एका विशिष्ट संदर्भात तो बरोबर असली तरी तेवढे पुरेसे नाही. विरोधकापुढे नमते घ्यायचे नसेल तर निदान आपली बाजू तरी खंबीर असायला हवी त्याउलट गेल्या बुधवारच्या घटनेने आरोग्यखात्याचे मंत्री व राज्यमंत्री यांच्यातच Communication gap असल्याचे दिसून आले व त्यामुळे 'कशाबद्दल निवेदन करायचे ते मला ठाऊक नाही' असे नामुष्कीचे उत्तर राज्यमंत्री सतीश चतुर्वेदी यांना द्यावे लागले. हे नामुष्कीचे प्रसंग सरकारवर आले याचे कारण सत्ताधारी पक्ष म्हणून विधिमंडळ कामकाजाबद्दलची जी तयारी असायला हवी होती, तिचाच पत्ता नव्हता ! त्यामुळेच अधिवेशनाच्या प्रारंभीच प्रा. म. सु. शिवनकर (भा. ज. प.) यांनी भातशेतीच्या संदर्भात मांडलेला एक बिनसरकारी ठराव सत्ताधारी सदस्यांच्या गैरहजेरीमुळे संमत होऊन सरकारला तांत्रिक पराभव पत्करावा लागला. तिकडे विधानपरिषदेतही राज्यमंत्री सुरेश देवतळे यांनी मांडलेल्या एका विधेयकावर विरोधकांनी सुचविलेली दुरुस्ती मंजूर होण्याच्या बेतात होती; पण अध्यक्षांच्या निर्णायक मतामुळे विधेयक वाचले.

सरकारपक्षाकडून अनेक संकेतांचेही उल्लंघन झाले. विविध खात्यांच्या अर्थसंकल्पीय मागण्यांच्या चर्चेच्या वेळी ज्या मंत्र्याने मागण्या मांडायच्या त्यानेच चर्चेला उत्तर द्यायचे अशी प्रथा असते; पण गेल्या अधिवेशनात या प्रथेचे पालन झाले नाही. तसेच सदनाचे कामकाज नीट चालावे ही प्रामुख्याने सत्ताधारी पक्षाची जबाबदारी असल्याने गणसंख्येअभावी कामकाज तहकुबीची वेळ येऊ नये याकडे सत्ताधारी नेत्यांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा असते. गेल्या अधिवेशनात मात्र राजाराम शिंदे (जनता) यांच्या एका खाजगी ठरावावर चर्चा चालू असताना महसूलमंत्री शालिनीताई पाटील यांनीच पुरेशी गणसंख्या नसल्याचे सभापतींच्या लक्षात आणून दिले व सभापतींना सभा तहकूब करावी लागली.

नव्या विधानसभेत, विशेषतः सरकार पक्षाकडे प्रथमच निवडून येत असलेल्या सदस्यांची सख्या मोठी आहे त्यामुळे केवळ आमदारांचाच नव्हे तर मंत्र्यांचाही नवखेपणा या ना त्या निमित्ताने जाणवत होता. अनेकदा विरोधकांनी उपस्थित केलेले मुद्दे स्थगन-प्रस्तावाचे विषय होऊ शकत नाहीत असा युक्तिवाद करण्याचा इंदिरा काँग्रेसचे

सदस्य प्रयत्न करीत. वस्तुतः अमुक एक विषय स्थगन प्रस्तावाचा आहे की नाही हे ठरविणारा निर्णय अध्यक्षानी द्यायचा असतो. तो विषय स्थगनप्रस्तावाचा नाही हे फार तर सदस्याने सांगावे अशी कल्पना असते. इंदिरा कॉंग्रेसजन मात्र एकदम लांबची उडी घेत व त्याचेच हसे होई. इंदिरा कॉंग्रेस-प्रमाणेच, अर्स कॉंग्रेसकडेही नवखे आणि तरुण सदस्य आहेत, पण त्यानी, तसेच भारतीय जनता पक्षानेही, आपापल्या आमदारासाठी प्रशिक्षणवर्ग आयोजित केले होते. इंदिरा कॉंग्रेसनेही जर ही कल्पकता दाखविली असती तर त्यांच्या सदस्यावर अशी वेळ आली नसती.

## व्यक्तिगत कामगिरी

एक Team म्हणून विधिमंडळात काही कामगिरी करून दाखविणे सत्ताधारी पक्षाला जमले नाही हे खरेच; पण बहुसंख्य मंत्र्यांची व्यक्तिगत कामगिरी फारशी आशादायक होती असे नाही. त्यातल्या त्यात मुख्यमंत्र्या-व्यतिरिक्त अर्थमंत्री रामराव आदिक, महसूलमंत्री शालिनीताई पाटील, बांधकाम-मंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर, समाजकल्याण राज्यमंत्री तारावाई वर्तक, कामगार राज्यमंत्री हरिभाऊ नाईक इ. नी काही वेळा चांगली चमक दाखविली. जळगावची दंगल असो किंवा राज्यपालांच्या भाषणावरील चर्चा वा गृहखात्याच्या मागण्यांवरील चर्चा असो मुख्यमंत्री अंतुले यांनी दमदार व तडाखेबाज भाषणे करून उत्तरे दिली. तातडीच्या व कार्यक्षम हालचालींवर आपला अधिक विश्वास आहे असे भासविण्याचा ते जाणीवपूर्वक प्रयत्न करीत. मध्यंतरी पोलिसात मुस्लिमासाठी जागा राखून ठेवण्याची अफवा होती. त्या संदर्भात सर्वश्री अण्णा जोशी (भा. ज. प.), गुलाबराव पाटील (जनता), सूर्यभान गडाख (अर्स कॉं.) प्रभृतींनी आणलेल्या स्थगन-प्रस्तावाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी अतिशय तडफदारपणे स्पष्टीकरण दिले. इंदिरा कॉंग्रेस सदस्यांना जरा 'बरे' वाटावे असे प्रसंग विधानसभेत खूप कमी वेळा आले, वरचा प्रसंग त्यापैकीच एक होता.

अर्थमंत्री रामराव आदिक यानीही अर्थ-संकल्पावरील चर्चा पूर्ण वेळ ऐकली व उत्तराच्या भाषणात विरोधकांच्या अनेक मुद्द्यांचा नीट परामर्श घेतला. अन्य मंत्र्यांपैकी कामगारमंत्री बॅ. भोसले यानीही मुद्देसूद भाषणे केली. राज्यमंत्री तारावाई वर्तक यांच्या भाषणातही त्या अनुभवी असल्याचे प्रतीत होत होते.

गृहनिर्माणमंत्री श्रीमती प्रमिलाबेन याज्ञिक व अन्न आणि नागरी पुरवठा राज्य-मंत्री दिनानाथ कमळे याचा मात्र विरोधकांच्या भडिमारापुढे अजिबात टिकाव लागला नाही. श्रीमती याज्ञिक यांची भाषेची अडचण गौण मानली तरी गृहपाठ करून न येण्याच्या त्यांच्या पद्धतीने विरोधकाचे चांगलेच फावले विधानपरिषदेत एकदा तर श्रीमती याज्ञिक यांची हलाखीची परिस्थिती पाहून त्यांच्या खात्याचे राज्यमंत्री चंद्रकान्त त्रिपाठी यांना अखेर 'मंत्र्याच्या मदतीला' धावून जावे लागले. श्री. कमळे यांच्याप्रमाणेच महसूल राज्यमंत्री खान मोहम्मद अजहर हुसेन व सहकार राज्यमंत्री एस. एन. देसाई या जुन्या व अनुभवी मत्र्याचीही त्रेधातिरपिट उडावी याचे आश्चर्य वाटलं. कादाखरेदी व कापूस-उत्पादकाना बोनस देण्याच्या प्रश्नावर एस. एन. देसाई चांगलेच गोंधळले. विरोधकाच्या उपप्रश्नाबाबतची पुरेशी माहिती त्याच्याजवळ नव्हती व तरीही बाजू सावरण्याचा ते केविलवाणा प्रयत्न करीत होते. अर्थात केवळ त्यांच्याच बाबतीत नव्हे तर इतर अनेक मंत्र्याच्या बाबतीतही असे प्रकार घडले. विरोधकाच्या निश्चित व नेमक्या प्रश्नाना मंत्र्याकडून गोल व गुळमुळीत उत्तरे मिळावी यात नवीन असे काहीच नाही; पण 'प्रश्न विचाराधीन आहे,' 'निर्णयाचा फेरविचार करू,' 'यथावकाश केले जाईल' ही सरकारी उत्तरांची ठरीव भाषासुद्धा प्रयत्नपूर्वक शिकावी लागते. ती न जमल्यामुळेच की काय, पुरवठा राज्यमंत्री दीनानाथ कमळे याना विधानपरिषदेत उद्योगमंत्री जवाहरलाल दर्डा यांची मदत घ्यावी लागली. हॉटेलातील पदार्थांच्या दरवाढीबद्दल मधू देवळेकर (भा. ज. प.) प्रभृतींनी आणलेल्या लक्षवेधी सूचनेवर निवेदन करताना कमळे यांनी 'सरकार काहीही करू शकत नाही.' असे अगतिकपणाचे उत्तर दिले. शेवटी 'दरवाढ रोकण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे' असे सुधारित उत्तर देऊन उद्योगमंत्री दर्डा यानी बाजू सावरून घेतली.

विधिमंडळाच्या अधिवेशनातील सरकारी कामगिरीच्या संदर्भात आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. या अधिवेशनाच्या काळात विधानपरिषदेचे सभापती रा. सू. गवई याच्यावर सरकारला इशारेवजा सूचना (Reprimand) देण्याची वेळ अनेकदा आली. विधानसभेतही सत्ताधारी मंत्री व सदस्यांना सावरताना सभापती शरद दिघे याना अनेकदा कसरत करावी लागली. सत्ताधाऱ्याच्या तुलनेत संख्येने कमी असले तरी गुणवत्तेच्या बाबतीत विरोधक खचितच वरचढ आहेत. त्यातच सत्ताधारी पक्षात जे कोणी अनुभवी लोक होते त्यातील बहुसंख्य मंत्रिमंडळात सामील झाल्यामुळे त्यांना वैधानिक वादंगात मोकळेपणाने भाग घेता येत नाही. सुधाकर नाईक, राम मेघे, नानाभाऊ एंबडवार सौ. प्रतिभा पाटील, बाळासाहेब देसाई ही जी काही जुनी, जाणती मंडळी मंत्रिमंडळाबाहेर आहेत ती कामकाजात फारशा हिरीरीने भाग घेताना दिसत नाहीत. इंदिरा कॉंग्रेसच्या सुमारे १९२ सदस्यापैकी त्यातल्या त्यात चांगली कामगिरी करू शकतील असे जे काही आमदार आहेत त्यात डॉ. वा. रा. शेरेकर, भाऊराव पाटील, प्रेमानंद आवळे, श्रीकांत जिचकर, वसंतराव चव्हाण, बाबुराव मडावी, शंकरराव बोबडे, सौ. यशोधरा बजाज इ.चा समावेश करता येईल. मधुकर पिचड या तरुण आमदारानेही आदिवासींच्या प्रश्नांवरील चर्चेत परवा अतिशय मुद्देसूद भाषण केले.

## पवारांचा प्रभाव

विरोधकापैकी, विरोधी पक्षनेते शरद पवार याचे कर्तृत्व आणि नेतृत्व वादातीत आहे. शरद पवार विधानसभेत वारंवार बोलत नाहीत. मोक्याच्या वेळी आणि महत्त्वाच्या प्रश्नावरच बोलतात; पण जेव्हा बोलतात तेव्हा मुद्देसूद व परखड विवेचन करतात. त्यामुळे अध्यक्षानाही त्यांच्या मुद्द्यांची वाजवी दखल घ्यावी लागते. अर्थसंकल्पावर सुमारे पन्नास मिनिटे शरदराव बोलले व अतिशय तडाखेबंद भाषणात प्रभावीपणे त्यानी मुद्दे मांडले. विशेष म्हणजे या भाषणात, तसेच राज्यपालाच्या अभि-

पृष्ठ २३ वर

# मराठवाडा

## मेडिकल विद्यार्थ्यांचा असंतोष का ?

अच्युत खोडवे

२२ जुलैला औरंगाबाद व अंबेजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देण्याचे काम चालू असताना विद्यार्थ्यांनी उग्र निदर्शने करून सध्याच्या प्रवेशासंबंधीचे धोरणाबद्दल आपली तीव्र नाराजी व चीड प्रखरपणे व्यक्त केली. परिणामत: संबंधित अधिकाऱ्याना आपले प्रवेश देण्याचे काम लाबणीवर टाकावे लागले. सध्या जरी हा प्रश्न तात्पुरता मिटलेला असला तरी असंतोष पुन्हा उफाळणार नाहीच याची शाश्वती देता येत नाही. कारण हा प्रश्न मराठवाड्याच्या वैद्यकीय महाविद्यालयाना मिळालेल्या १५० जागाचा उपयोग मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे होत नसल्याने निर्माण झालेला आहे. त्यामुळेच मराठवाड्यावर होणाऱ्या एकूण अन्यायाशीही तो जोडला जातो. ही सगळी पार्श्वभूमी ध्यानात न घता उचलले गेलेले कुठलेही पाऊल म्हणूनच तात्पुरते ठरेल व मेडिकलच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न व्यापक स्वरूप केव्हाही धारण करू शकेल. मेडिकल विद्यार्थ्यांच्या या असंतोषामागची पार्श्वभूमी कोणती आहे ? मराठवाड्याबाहेरील विद्यार्थ्यांमुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो म्हणज काय होते ?

जे विद्यार्थी बाहेरून येऊन, एक वर्ष येथे राहून, इथल्या कुठल्या तरी एका महाविद्यालयात प्रवश मिळवून, मराठवाडा उच्च माध्यमिक मंडळाच्या बारावीच्या परीक्षेस बसले आहेत त्यानी एवढा खटाटोप का केला ? त्या विभागात उच्च माध्यमिक मंडळ नव्हते काय ? किंवा १२ वीची परीक्षा काही अकल्पित कारणामुळे त्याना तेथ देता यत नव्हती का ? अकरावाच्या परीक्षेकरिता मात्र मराठवाडा माध्यमिक मडळाला अनुग्रहीत करावयाचे, हे कशासाठी? याचे एकच कारण सभवते. ते म्हणज ते ज्या विभागातून आले आहेत या विभागाच्या स्पर्धेत त्याचा क्रम वरचा लागणार नाही या भीतीपोटी ते बारावाच्या परीक्षकरिता येथे आले व पालकांनीही त्याचा खर्च सोसला. मराठवाड्यात वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण शक्य व्हावे याकरिता त्यानी हा आडमार्ग स्वीकारला. मराठवाड्यातील दोन वैद्यकीय महाविद्यालयाना एकूण मिळालेल्या १५० जागापैका ३५ किंवा ४० जागा अशा प्रकाराने बाहेरच्या विद्यार्थ्यांना मिळणार असतील तर त्या संख्येइतके मराठवाड्यातील विद्यार्थी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळण्याच्या संधीपासून वंचित राहतील हे साधं गणित आज विद्यार्थ्यांच्या चागले लक्षात आले आह. म्हणून ते आज कोणत्याही धाक-दडपशाहीला भीक घालणार नाहीत हे वेळीच लक्षात घेतलेले बरे.

महाराष्ट्रात संपूर्ण वैद्यकाय महाविद्यालयाकरिता असलेल्या एकूण जागा दीड हजार आहेत. त्यापैकी मराठवाड्याच्या वाट्याला मात्र १५० जागा आल्या आहेत. म्हणजे महाराष्ट्राच्या एकूण १/१० जागा मराठवाड्याकरिता आहत. लोकसख्या व इतर गोष्टी लक्षात घतल्या तर कमात कमा १/६ जागा म्हणज २५० जागा तरी मराठवाड्याच्या वाट्यास यावयास पाहिज होत्या. अशी परिस्थिती असताना मराठवाड्याच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या केवळ १५० जागावरही आक्रमण होणार असेल तर मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी ते का म्हणून सहन करावे ?

या संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब निदर्शनास आणणे जरुरीचे आहे. अनुसूचित जातीजमाती व इतर मागासवर्गीय लोकांकरिता राखून ठेवलेल्या चोवीस टक्के जागातही मराठवाड्याबाहेरच्याच विद्यार्थ्यांचा अधिक भरणा आज तरी दिसून येतो. त्याची अनेक कारणे असू शकतील. त्याबद्दल विचार करण्याची ही जागा नव्हे व माझा तो उद्देशही नाही. या लेखाद्वारे फक्त एवढेच सुचवावयाचे आहे की, येथही मराठवाड्याबाहेरून येणाऱ्यांची सख्या तीस पेक्षा कमी नाही.

याशिवाय बाहेरच्या विद्यार्थ्यांचा बोजा टाकण्यात आला आहे. केंद्रीय सरकारकरिता राखून ठेवलेल्या दहा जागा, महाराष्ट्रातील जे लोक संरक्षणखात्यात काम करतात त्यांच्या मुलांसाठी राखून ठेवलेल्या तीन जागा व जे मुळात महाराष्ट्राचे रहिवाशी आहेत, पण महाराष्ट्रात सध्या रहात नाहीत अशाच्याकरिता राखून ठेवलेल्या दोन जागा अशा सबंध महाराष्ट्राच्या पंधरा जागापैकी सहा जागांचा बोजा मराठवाड्यातील वैद्यकीय महाविद्यालयांवर टाकण्यात आला आहे. हा बोजा मराठवाड्याला देण्यात आलेल्या १५० जागाच्या प्रमाणात पडावयास पाहिजे होता. म्हणजे जास्तीत जास्त एक किंवा दोनच विद्यार्थ्यांकरिता मराठवाड्यात वैद्यकीय महाविद्यालयात जागा राखून ठेवणे न्याय्य झाले असते.

याप्रमाणे बाहेरच्या विद्यार्थ्यांनी येथे येऊन मिळविलेल्या जागा व वर वर्णन केलेल्या राखीव जागा या सर्वांचा सकलित विचार केला तर मराठवाड्याच्या विद्यार्थ्यांकरिता फक्त ८० जागाच शिल्लक राहतात. आधीच जागेची अन्याय्य प्रमाणात वाटणी झाली आहे. त्यापैकी ७० जागा या ना त्या कारणाने बाहेरच्या विद्यार्थ्यांना राखून ठेवल्यासारख्या आहेत. अशा परिस्थितीत वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे क्रमप्राप्त आहे.

येथे आणखी एक गोष्ट निदर्शनास आणणे आवश्यक वाटते. पूर्वी ज्या वेळी पी. यू. सी. व पी. पी. सी. च्या परीक्षा घेण्यात येत होत्या त्या वेळी जे विद्यार्थी पी. यू. सी. व पी. पी. सी. या दोन्ही परीक्षा मराठवाड्यातील महाविद्यालयातूनच उत्तीर्ण झाले असतील, त्यानाच फक्त मराठवाड्यातील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देण्यात येत असे; परंतु १०+२+३-ही शिक्षणपद्धती अमलात आल्यानतर मात्र फक्त १२वीचाच निकष लावण्यात येऊ लागला. तो तसा का लावण्यात आला हे समजणे कठीण आहे. परिणामत: मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना त्याच्या न्याय्य हक्कापासून वंचित होण्याची पाळी आली आहे.

मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात जो समाविष्ट झाला तो एक विभाग म्हणूनच. हा विभाग मागासलेला असल्यामुळे, सब घोडे बारा टक्के असे समजून शासकीय धोरण आखणे चुकीचे होईल. मराठवाड्याच्या मागासलेपणामुळे या विभागाच्या काही समस्या आहेत. काही प्रश्न आहेत. ते सहानुभूतीने समजून घेण अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र सरकारने मराठवाड्यातील हा परिस्थिती लक्षात न घेताच बऱ्हशी धोरणे आखलली आहेत, निर्णयही घेतलेले आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्यामुळे मराठवाड्याची मोठ्या प्रमाणात पीछेहाट होत आली आहे. ही पीछेहाट थाबावी व मराठवाड्याचे सर्व दृष्टीने हितसंबंध संरक्षित व्हावेत म्हणून तेलगणाप्रमाण मराठवाड्यालाही सावंधिक मडळ (Statutory Board) असणे व इतर तरतुदी करणे जरुरीचे आहे, तशी भारतीय सविधानात तरतूद आह. त्या दृष्टीन महाराष्ट्र सरकारने व मराठवाड्यातील नेत्यानीही प्रयत्न करणे आज आवश्यक झाले आहे. ती एक काळाची गरज आहे ☐

# पंचायत राज्य....कळवण स्टाइल

स्वातंत्र्यदिनानिमित्त एक 'वेगळे' वार्तापत्र । रघुवीर मुळे

दिनांक २९ जुलै ८०. तालुका कळवण. जिल्हा नासिक. स्थळ–पंचायत समिती कार्यालय. सभापती सावळेराम पुनाजी चव्हाण स्थानापन्न घंटीवर हात.

बीडीवला बोलाव.

बीडीव ( B. D. O. ) येतात. चर्चा होते. आमदारांनी सांगितलंय् २ तारखेला मिटिंग घ्या. सगळयांना बोलवा, सरपंच, चेअरमन, सगळे सरकारी अधिकारी. आदेश घेऊन बीडीव कचेरीत.

आजची तारीख २९ आहे अजेंडा तयार करणे, सायक्लोस्टाइल करणे, त्याच्या चार-पाचशे प्रती काढणे, पत्रे लिहिणे, पोस्टात टाकणे या गोष्टीला दोन दिवस जातील आणि नेमकी मिटिंग बोलावली त्याच दिवशी जर पत्रं हातात पडली तर कोणत्या पूर्वतयारीनिशी सरकारी अधिकारी येऊ शकतील, लोकप्रतिनिधी येऊ शकतील, असा साधा प्रश्नही बीडीवने केला नाही. मग अशा प्रकारे बैठक बोलावून वेगवेगळया खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्याला 'अजेंडयाने' बोलावण्याचा अधिकार नाही, हे बीडीव सभापतीला कसे सागू शकणार ?

झाले ! 'ड्राफ्ट' तयार झाला. (ओरिजनल पुढीलप्रमाणे )–

**विनंतीपत्र**

पंचायत समिती,<br>कळवण.<br>क्र प्रशासन । ।८०<br>कळवण, दि. २९।७।८०

श्री. १) म. सरपंच । चेअरमन,

रा.······पो······ता. कळवण

तालुक्यातील विकासाच्या दृष्टीने पंचायत समिती कळवण येथे पं. स. सभागृहात रोज शनिवार दि. २।८।८० रोजी सकाळी/दुपारी ठीक १२ वाजता सभा आयोजित केली आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे ही विनती.

विषय १ :– कळवण तालुक्यातील सहाव्या पंचवार्षिक योजनेचा गाववार विकास कामाचा आराखडा तयार करणे.

विषय २ :–गाववार रोजगार हमी कामाचा आराखडा तयार करणे.

विषय ३ :– गाववार पाटबंधारे, नालाबंडिंग, वृक्षारोपण, अल्पबचत, कुटुंबकल्याण, जीवनवश्यक वस्तूचे वितर (?) इत्यादी कामांच्या अडीअडचणी समजावून घेणे.

विषय ४ :– कळवण तालुका नियोजित सहकारी साखर कारखाना उभारणीस गाववार उसाचे क्षेत्र संबंधीची माहिती यावर विचारविनिमय करणे.

विषय ५ :— तालुक्यातील विद्युतीकरणाबाबत विचार करणे.

(सा. पु. चव्हाण)<br>सभापती, पंचायत समिती, कळवण

प्रत :– (१) तहसीलदार, कळवण (२) म. प्रोजेक्ट ऑफिसर, आय.टी.डी.पी. कळवण (३) मा. कार्यकारी अभियंता, म. रा. विद्युत मंडळ, मालेगाव. (४) मा. कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी. मालेगाव. (५) म. उपअभियंता, बी अँड सी. उपविभाग, कळवण (६) म. उपअभियंता, जि. प. उपविभाग, कळवण. (७) म. उपअभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, कळवण (८) म. उपअभियंता, रोजगारहमी, उपविभाग, कळवण (९) म. वनक्षेत्रपाल, कळवण (१०) वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्यकेंद्र, दळवट, अभोणा. (११) सबडिव्हिजनल सॉइल कॉन्झर्वेशन ऑफिसर, चादवड.

वरील सभेस माहितीसह उपस्थित रहावे ही विनती.

¤

झाले. पत्र तातडीने रवाना झाले. बाजाराचाच दिवस. पत्र घरी आले की नाही तो प्रश्नच नव्हता. एक फेरी 'पंस' मध्ये ठरलेलीच.

२ ऑगस्ट ८०. शनिवार. मंडळी उत्साहानं जमू लागली. अधिकाऱ्याच्या गाडया लागल्या. १२ वाजले. एक वाजला. दीड वाजला. उपस्थित चेअरमन, सरपंच, मेंबरात चुळबूळ सुरू झाली. (खरे संवाद अहिराणीत, अस्सल.)

'का हो, मिटिंग का नाही होत सुरू ?'

'आमदार यायचेत.'

'पण आता आम्हाला बाजार करायचाय्. आम्ही चाललो तुम्ही करा विकास!'

'थावा थावा.'

दुसऱ्या कोपऱ्यात तर वेगळाच सूर होता.

'तुम्हाला ही मिटिंग कोणी बोलवायला सांगितली ? नस्ते धंदे. आपला (पंचायत समितीचा) विकासाचा संबंध ?'

'असं कसं म्हणता !'

'मग ? काय म्हणू ? गावच्या शाळेची भित पडून सहा महिने झाले. पावसाळयात पोरं मातीत बसतात. पंचवीस रुपडयांचा गवंडी लावून दुरुस्त करीत नाहीत न् विकासाच्या बैठकी घेतात !'

'बैठकीत अडीअडचणी सागा !'

¤

'नमस्कार, सभापती.'

'नमस्कार !'

'पहिला विषय, सहावी पंचवार्षिक योजना कधी सुरू होणार ?'

सभापती आशाळभूतपणे बीडीवकडे पहातात. बीडीवना प्रश्न, 'समजल्याने' ते 'अजेंडा' चाळत म्हणतात–

'बारा वाजता सुरू होणार होती, आमदार नसल्याने थोडी उशीरा सुरू होईल.'

सूज्ञ सभासद मूक. पण चर्चा करतात.

'गाववार रोजगार हमी कामाचा आराखडा हा प्रकार काय ?' उत्तर नाही.

'अहो सभापती, हे काय नाटक चाललंय् ? गाववार रोजगार हमी, गाववार पाटबंधारे ? अहो तालुक्यातील पुनद, सुळं, पिंपळं धरणही आमदारानी गाजरं बाधून केलं नाही. तिकडं देवळयाच्या पूर्व भागात विहिरीनाही पाणी नाही. जिऑलॉजिस्टचे रिपोर्ट काय म्हणतात-अन् तुम्ही काय गाववार पाटबंधारे बाधण्याची मिटिंग बोलावता ! वृक्षारोपणाला काय मिटिंग लागते ? जीवनावश्यक वस्तूचे वाटप पंचायत समितीकडे आलंय् ? कळवण तालुक्यात साखर कारखाना होतोय्. म्हणजे अजून प्रकरणही केंद्राकडे गेलं नाही तर तुम्ही उसाचं क्षेत्र वाढविण्याची चर्चा करता ? एकीकडं पाणी–पाटबंधारे नाही म्हणता ? अन् काहो, नियोजित सहकारी साखर कारखान्याचा एक तरी पदाधिकारी बोलावलात का तुम्ही ?'

बीडीव कोरे कागद सरसावतात. ते भरभर लिहून घेत असतात. सभापती विचारतात-

'काय लिहून काय घेताय ?'

'कच्चे प्रोसिडिंग.'

'पक्क्या शिव्या !'

¤

वातावरण तापल्याने अॅडव्होकेट शशिकात पवार 'चेअर'चा ताबा घेतात. पंचायत समितीचा या बैठकीशी संबंध नाही, पण आपण आलाच आहात आमच्या कार्यालयात तर यजमान म्हणून चहा पाजतो, म्हणतात. चहा येईपर्यंत पेल्यातलं वादळ उखाळया-पाखाळया, रोजगार हमीवर शेरे–ताशेरे आणि मिटिंग सपते. जन गण 'मना'त किंतुही न ठेवता निघून जातात.

पण मग सरकारी अधिकाऱ्याचा वेळ, पैसा, तुंबवलेली कामे, त्याचे भत्ते याचा हिशेब कोण आणि का करणार ? ☐

# २२ जून १८९७

# एका स्वातंत्र्यपर्वाचे अनैतिहासिक चित्रण

सतीश कामत

'२२जून १८९७'हा चित्रपट पाहिला आणि दोन गोष्टी प्रकर्षानं जाणवल्या. एक दामोदर हरी चापेकर हा कुणी तरी माथेफिरू तरुण होता. इंग्रज सरकार करत असलेल्या अत्याचारापेक्षाही प्लेगची भयानक साथ व त्यामध्ये आपल्या मित्राचा गेलेला बळी त्याला जास्त बोचला. त्याने पिस्तुल उचललं. डाव रचला आणि रँड नावाच्या एका इंग्रज अधिकाऱ्याचा हकनाक प्राण गेला. दोन, रँड हा एक खास इंग्रज शैलीतला अधिकारी होता. त्याचं वागणं, बोलणं मोजकं व नेमकं असायचं. इंग्रजांची शिस्त व काटेकोरपणा त्याच्यामध्ये होता. आपल्यावर खुनी हल्ला होण्याची शक्यता माहीत असूनही कोणतंही जादा संरक्षण न घेता तो एका समरंभाला गेला आणि देशाची सेवा करत असताना आपला देह त्यानं समर्पित केला. तो जर अजून जगला असता तर निश्चितच फार वरच्या पदाला पोचला असता

पण याबरोबरच एक जबरदस्त शकाही मनामध्ये निर्माण झाली. आपल्याला हे जे वाटत आहे ते योग्य असेल तर मग इतिहासकार चापेकरांना वासुदेव बळवंतापासून तर स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंतच्या थोर क्रातिकारकाच्या पंक्तीला का बसवतात ? या कुतूहलातूनच लोकमान्य टिळकानी त्या काळात लिहिलेले काही अग्रलेख वाचले, साहित्यसम्राट न. चि. केळकरानी टिळकाचं लिहिलेलं चरित्र चाळल. श्री. वि. श्री. जोशी यांचं–'मृत्युंजयाचे आत्मयज्ञ' या पुस्तकातील चापेकरांवरचं प्रकरण वाचलं. कै. आहिताग्नि राजवाड्यानी लिहिलेल्या आत्मवृत्तातला या विषयाशी संबंधित भाग वाचला. स्वतः दामोदर चापेकरानी लिहिलेलं आत्मवृत्त वाचलं. इतरही काही संदर्भ पाहिले आणि असं लक्षात आलं की केवळ चित्रपट पाहून आपला चापेकरांविषयी होणारा समज आणि तत्कालीन वस्तुस्थिती यामध्ये फार फरक आहे !

साधं त्या वेळच्या प्लेगच्या साथीचं उदाहरण घेऊ. चित्रपटात दाखवल्याप्रमाणे दोन-चार किळसवाणे, मरतुकडे उंदीर, रोगी किंवा प्रेत लपवण्यासाठी त्या काळातल्या नागरिकांची चाललेली धडपड, घर सोडायला नाराज असलेली तरुणी, साथीमुळं होणारे मृत्यू एवढंच या सबंध परिस्थितीचं स्वरूप होतं का ? चित्रपटात हे प्रसग पाहात असताना आपणही कुठे तरी इंग्रज अधिकाऱ्याबद्दल द्वेषाच्या भावनेनं पेटून उठतो का ? तसं काहीही फारसं घडत नाही.

या साथीमुळं केवळ एवढंच घडत नव्हतं. इंग्रज अधिकारी घरात घुसून समया, भाडी, गाठोडी बाहेर फेकतात यापेक्षाही ते देवाधर्माची, घराची विटंबना करतात ही गोष्ट तत्कालीन समाजाला अधिक चीड आणणारी होती. हे अधिकारी तेवढ्यावरच थाबत नव्हते. एखाद्या देशावर आक्रमण करणारे सैनिक जसे शत्रूचा निःपात केल्यावर तिथल्या स्त्रियाकडे मोर्चा वळवतात आणि त्याच्यावर तुटून पडतात तसंच इथंही घडत होतं. काही ठिकाणी स्त्रियांना रस्त्यावर खेचून संपूर्ण विवस्त्र करून त्याची तपासणी केली जात होती व अशा स्त्रियानी नंतर विहिरीत उड्या टाकून जीव दिले, अशीही नोद इतिहासात आढळते !

हे सर्व इतकं असह्य होतं की एरवी मवाळ म्हणविलं जाणारं 'सुधारक' हे वर्तमानपत्रही त्या काळात लेखणीमधून आग बरसत होतं.

१२ एप्रिल १९८७ च्या 'सुधारक' मध्ये संपादक लिहितात–

'इंग्रज सरकारचे अंमलदार इतके बेगुमान होतील असे वाटले नव्हते. घर तपासताना रँडच्या सोजिरानी यमदूतांची वागणूक दिली ! घरात बाळंतीण आहे ! ओढा तिला बाहेर ! डोळे दुखरे आहेत, घाला गाडीत ! हा तडाखा सुरू आहे ! हे आहे काय ? हा का बदोबस्त, का घुमाकूळ, का रँडशाही !'

पुढल्या आठवड्यात संपादक पुन्हा लिहितात–

'इतक्या दिवस चोरीवर भागत होते; पण आता बायकांच्या अंगावर हात टाकण्यातही मजल येऊन ठेपली आहे ! आणि इतके सारे प्रकार घडत असून आमचे लोक पहावे तो आपले शांत ! खरोखर आपल्या लोकांसारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेही सापडणार नाहीत असे मोठ्या शरमेने कबूल केले पाहिजे ! अरे, तुम्ही असे अगदी नि.सत्त्व कशाने झाला ? आपल्या आप्तांची अब्रू बचावण्यासाठी थोडी तरी हालचाल करा ! अरे, असे भागुबाईसारखे रडता का ? आडदांडास कायदा शिकवा ! .........अंगावर चालून आलेल्याचा प्रतिकार करणे बेकायदेशीर वर्तन करणाऱ्याला कायदा किंवा हात दाखविणे हा काही गुन्हा नव्हे ! माणसासारखे स्वतःच्या पायावर उभे रहा आणि दाखवा या ब्रिटिश खोंडांना !'

१७ मे १८९७ च्या 'सुधारक' मध्ये म्हटलं आहे–

'..या सगळ्यातील इगित एकच आहे आमचा स्वाभिमान नष्ट झाला आहे आणि थोडासा अवशिष्ट आहे तो हतवीर्य होऊन पडला आहे. पेटीतला पैसा गेला--तुमच्या काका मामास दहा दहा जणानी मिळून नागवे केले आणि नाचावयाला लाविले ! इतके सगळे झाले तरी तुमच्या एकाच्यानेही त्याचा प्रतिकार जागच्या जागी

करवला नाही हे कशाचे लक्षण ? या खोंडांनी तुम्हाला आणखीही डिवचले तुमच्या आयाबहिणी, लग्नाच्या बायका यांची विटंबना केली, त्यांच्या अंगावर फुले टाकिली, त्यांच्याशी पाठशिवाशिवी केली. तरी देखील तुम्ही आपले संथ ते संथच ! धिक्कार असो असल्या समाजाचा !'

साथीच्या काळातील परिस्थिती आणखी वर्णन करण्याची गरजच नाही. स्वतः लोकमान्य टिळकानी 'ग्रंथिक सन्निपात व सरकार' (१६ फेब्रुवारी १८९७), 'साथीच्या तापाच्या निवारणार्थ मुंबई सरकारने केलेले नियम' (२ मार्च १८९७), 'साथीच्या तापाचा प्रसार बंद करण्याकरिता नवी योजना'(९ मार्च १८९७) 'पुण्यात सध्या चालू असलेला धुमाकूळ' (१६ मार्च१८९७)व 'पुण्यावर आलेला सध्याचा प्रसंग' (६ एप्रिल १८९७) असे एकामागून एक पाच अग्रलेख 'केसरी' मध्ये लिहिले. सुरुवातीच्या अग्रलेखांमध्ये टिळकांचा सूर आशावादी आहे, त्यांनी स्वतःही या साथीवर काही मौल्यवान उपाययोजना या लेखांमधून सुचविली आहे. पण शेवटल्या दोन अग्रलेखांची नुसती शीर्षक वाचली तरी टिळकांची अस्वस्थता त्यामधून स्पष्टपणे जाणवते अर्थात त्यांची भाषा मात्र 'सुधारकां' पेक्षा पुष्कळच संयमित आहे.

६ एप्रिलच्या लेखात टिळक म्हणतात–

'आज तीन आठवडे होऊन गेले. इतक्या मुदतीत पुण्यातील लोक प्लेगपेक्षा प्लेग बंद करण्याकरिता म्हणून जी व्यवस्था सुरू आहे त्या व्यवस्थेने अधिक त्रासून गेले आहेत. ज्यांस म्हणून गावाबाहेर जाण्याची सवड होती त्यापैकी बहुतेक सर्व लोक गाव सोडून गेले व जे गावात राहिले आहेत त्यांस हे जुलमाचे दिवस कधी संपतात असे होऊन गेले आहे. खुद्द गव्हर्नरसाहेबांचे उद्गार व भाषणे पहावी तर त्यात गरिबांबद्दल खरी कळकळ दाखविलेली पाहून आनंद वाटतो; पण वेदांत्याचे कीर्तन ऐकून घरी आल्यावर पुन्हा ज्याप्रमाणे पुराणातली वांगी पुराणात म्हणण्याचा प्रसग येतो तद्वत हल्ली चालू असलेली व्यवस्था पाहून मनाची स्थिती होते व एखादे वेळेस असेही वाटते की, लोकांस अशा रीतीने रोज त्रास देण्यापेक्षा एकदाच जुलुमाने सगळ्यांस डॉक्टर हाफकीन् यानी नवीन कल्पना काढल्याप्रमाणे सरकारने प्लेग टोचून काढविल्यास एकदाची कटकट मिटेल! हे उद्‌गार निराशेचे आहेत; पण तसे उद्‌गार काढणे आमच्या नशिबी आले आहे ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे.'

लेखाच्या शेवटी टिळक म्हणतात–

'अलीकडे दोन दिवसात शहरातील एकंदर मृत्यूची संख्या चोवीस–पंचवीसपर्यंत येऊन ठेपली आहे. ही स्थिती अशीच कायम राहिल्यास रोगाची व रोगप्रतिबंधक व्यवस्थेची अशा दोन्ही साथी लौकरच बंद होतील. नाहीपेक्षा बहुतेक सर्व लोकांस पुणे शहर सोडून देण्याची पाळी येईल.'

प्लेगच्या साथीच्या संदर्भातील 'सुधारक' व 'केसरी' मधील नुसते हे लेख वाचले तरी त्या काळातील इंग्रज अधिकाऱ्यांच्या वर्तनाने टिळक–आगरकरांसारखे पुढारीसुद्धा किती अस्वस्थ झाले होते याची कल्पना येते. मग दामोदर चापेकरसारख्या सनातनी, हिंदु धर्माभिमानी, पौरुष जागं असणाऱ्या तरुणाची किती घालमेल चालली असेल ! पण चित्रपटात याचा मागमूसही जाणवत नाही. टिळक–आगरकर जो त्वेष केवळ शब्दामधून जागा करतात तो या चित्रपटाच्या निर्मिते–दिग्दर्शकांना संपूर्णतः आधुनिक असं दृक–श्राव्य माध्यम हाताशी असूनही करता आलेला नाही !

अर्थात प्लेगच्या साथीत गोऱ्या सोजिरांनी घातलेला धुमाकूळ पाहून चापेकर चवताळून उठले आणि त्यांनी रँडचा खून केला असं म्हणणंही पूर्णपणे योग्य होणार नाही. वडिलांबरोबर कीर्तनाला साथ करण्यासाठी चापेकरबंधू फिरत असताना एकदा रायपूरला चालले होते वाटेत वृक्षाच्छादित डोंगराळ प्रदेश त्यांनी पाहिला आणि ही जागा भयंकर कृत्ये करून आश्रम घेण्यास किती सोइस्कर आहे असा विचार त्यांच्या मनात आला. या संदर्भात दामोदर चापेकर आत्मवृत्तात लिहितात–

'या वेळेस आमचे दोघांचे वय अनुक्रमे १५ व भावाचे १२ असावे. हाच आमच्या मानसिक विचाराचा आरंभ होय. कोणाचा कोणासी द्वेषभाव जडण्यास काही तरी कारण लागते; पण आमचा जो या इंग्रज लोकांविषयी द्वेष जडला आहे त्याचे कारण पाहू लागल्यास या जन्मीचे काही कारण लक्षात येत नाही.'

या प्रसंगावरून असं लक्षात येईल की रँडचा खून करण्यापूर्वी जवळजवळ एक तपाहून जास्त काळ इंग्रजांविषयीचा द्वेष चापेकरबंधूंच्या मनात धुमसत होता. त्यांनी मुलं जमवून व्यायामाला सुरुवात केली ती केवळ रँडला मारण्यासाठी नव्हे तर आपल्या घरात शिरलेल्या जबरदस्त चोराना हाकलून लावण्यासाठी बारा–पंधराव्या वर्षापासून या बंधूचे मनसुबे आणि प्रयत्न चालले होते. त्यातूनच गोफण शिकवणं सुरू झालं, शस्त्रास्त्रं गोळा करण्यात येऊ लागली, पर्वतीच्या पायथ्याशी मारुतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गोफणीचे वर्ग चालतात तिथला मारुती म्हणून त्याचं नामकरण 'गोफण्या मारुती' असं करण्यात आलं.

चापेकरबंधूना सैन्यामध्ये जाण्याची फार इच्छा होती. त्यासाठी कोल्हापूर, कुरुंदवाड, मिरज, सांगली, पुणे मुंबई, बडोदा, सिमला इत्यादी शक्य त्या सर्व ठिकाणी प्रयत्न केले. कुठेच दाद लागत नाही असं लक्षात आल्यावर बाळकृष्ण चापेकराने सैन्यात प्रवेश मिळवण्यासाठी नेपाळलाही जायचा प्रयत्न केला; पण तो सफल झाला नाही. चापेकरांचा हा सैन्यात नोकरी करण्याचा विचारही केवळ आपली रग जिरवण्यासाठी नव्हता. सैन्यात शिरून १८५७ प्रमाणे पुन्हा एकदा स्वातंत्र्ययुद्ध छेडण्याचा त्यांचा मनसुबा होता. त्यांना असं वाटत होतं की, १८५७ साली महाराष्ट्र स्वस्थ होता म्हणून यश आलं नाही. या वेळी सुरुवातच महाराष्ट्रात करावी; पण सैन्यात प्रवेश न मिळाल्यामुळं त्यांचा सर्वच बेत फसला. या संदर्भात चापेकर लिहितात–

'मग काय करावयाचे याचा विचार करिता मी बंधूंना म्हणालो की, अजून एक अर्ज असा करावा की, जर तुम्ही आमच्यासारख्या युद्धकलेविषयी शोकी मनुष्यास योग्य ठिकाणी चाकरीस ठेवीत नाही तर आम्ही आपला शोक कसा पूर्ण करावा ? बंडे करावीत काय ? अशा तऱ्हेचा अर्ज करणे म्हणजे उघड शत्रू होणे होय असा विचार करून आम्ही ठरविले की, इंग्रज हे आमचे कट्टे शत्रू होत. त्याच्यामुळे आपणास ही परतंत्रता प्राप्त जाहली आहे. करिता याच्याविरुद्ध गोष्टी करायच्या. हेच आमचे आणि इंग्रजाचे

वाकडे होण्याचे पहिले जबरदस्त कारण होय!'

हे सर्व थोडं विस्तारानं लिहिण्याचं कारण या घटना चित्रपटात पाहताना केवळ रँडला मारण्याच्या दिशेने चापेकराचे हे सर्व प्रयत्न चालले आहेत असं वाटतं; पण या विविध संदर्भावरून असं लक्षात येईल की, एका व्यापक कार्याचा तो एक अतिशय छोटा भाग होता. चापेकर म्हणतात –

'जय मिळणे न मिळणे हे प्रारब्धावर आहे. त्याचा संबंध आपल्या मोठेपणाशी बिलकुल नाही असे समजून आम्ही इंग्रजांशी कंबर बांधली. प्रथम कोणते कार्य हाती घ्यावे या विचारात आम्ही पडलो. जे काम करायचे ते अत्यंत महत्त्वाचे असले पाहिजे; जे केले असता सर्वतोमुखी चर्चा होऊन आई–बाबांस आनंद झाला पाहिजे आणि इंग्रजास अत्यंत वाईट वाटून राजद्रोहाचा स्पष्ट शिक्का मिळाला पाहिजे!'

हे सगळं ठीक आहे; पण मग रँडचा खून तरी चापेकरानी जाणून-बुजून, मनात पूर्वीपासून द्वेष असल्यामुळं केला का? याबाबतीत एक प्रवाह असा आढळतो की, लोकमान्य टिळकानी चापेकरांना हे कृत्य करण्यास भरीला घातलं व केवळ टिळकाना आपलं पाणी दाखवण्यासाठी चापेकरांनी रँडचा खून केला! या संदर्भातील घटना अशी –

'१३ जून १८९७ रोजी पुण्यातील लकडीपुलाजवळच्या विठ्ठल-मंदिरात शिवजयंतिउत्सव होणार होता. उत्सवात प्रो. भानू, प्रो. जिनसीवाले, शिवरामपंत परांजपे याची भाषणं होणार होती. लोकमान्य टिळक उत्सवाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रो. जिनसीवाले व प्रो. भानू यांचा त्या सभेत शिवाजीच्या चरित्रापासून बोध कसा घ्यावा या विषयावर जोरदार वाद झाला. त्याच सभेत चापेकरानी पुढील स्वरचित श्लोक म्हटला –

वाक्शौर्योद्भव उच्चवृक्ष सुफला नाही कधी ऐकिले
स्वप्नी स्त्रीमुख चुंबुनी नच कधी संतानही जाहले
बोलावे परि वृष्टिहीन घनसे गर्जू नका हो असे
रडानीति पराक्रमाविण जनी होते तियेचे हसे।
नाही होत स्वतंत्रता शिवकथा घोटूनि भाटापरी
घ्यावे लागतसे शिवाजी बाजीपरि हे मस्तक स्वहस्तावरी।
हे जाणोनि तरी अता सुजन हो घ्या खड्ग ढाला हाती।
मारा थाप भुजावरी अरिशिरे तोडू असंख्यात ती।

लोकांना अशा तऱ्हेने डिवचत असतानाच चापेकर स्वतःची प्रतिज्ञाही या श्लोकापाठोपाठ म्हणत –

ऐका युद्धभूमीवर ह्या प्राणासि देऊ धका।
जे जे भाषण बोललो बहुजनी तो फार्स मानू नका।
धर्मध्वंसक शत्रुवक्षरुधिरा पाडूच भूमीवरी।
मारूनीच मरू अम्ही-तुम्ही स्वये ऐकाल रांडापरी।

चापेकरांचे हे श्लोक कोणालाही आव्हान देणारे असेच होते. सभा संपली आणि लोकमान्य टिळकानी चापेकरबंधूना एका बाजूला घेऊन बजावलं –

'आज ज्यानी भाषणे केली त्यांना तुम्ही राडा असे संबोधन दिलेत; पण ज्यानी श्लोक म्हटले त्यांच्यात काही पौरुष असते तर एव्हाना रँड जिवत राहिला नसता!'

दोघंही भाऊ घरी गेले. रात्री बराच वेळ अंथरुणावर पडून होते; पण झोप येईना. बाळकृष्णाने दामोदरला लोकमान्यांनी म्हटलेल्या वाक्याची आठवण करून दिली. दामोदर फक्त एवढंच म्हणाला – 'बळवंतरावानी इच्छा प्रदर्शित केली आहे. त्याची इच्छा आपल्याला प्रमाण आहे!' दोघेही भाऊ मनाशी काही तरी निश्चय करून निश्चितपणे झोपी गेले आणि इथेच रँडच्या वधाची पहिला ठिणगी पडली!

हा महत्त्वाचा ऐतिहासिक संदर्भ चित्रपटात पूर्णपणे वगळण्यात आलेला आहे आणि त्यामुळे चापेकरांच्या कृतीचे भक्कम तार्किक स्पष्टीकरण मिळू शकत नाही.

या वधामागे एक तत्कालीन राजकीय-सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे कारण आहे. १८९७ साली इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया सत्तेवर आल्याला साठ वर्षं पूर्ण होत होती व त्यानिमित्त जगाच्या पाठीवर ज्या ज्या ठिकाणी इंग्रजाचा अंमल होता त्या सर्व ठिकाणी भव्य उत्सव साजरा करण्याचे आदेश निघाले होते. भारत देशही त्याला अपवाद नव्हता; पण १८८५ ते १८९७ या बारा वर्षांच्या काळात देशाच्या विविध भागात दुष्काळ व रोगराईने अक्षरशः थैमान घातलं होतं. अशा परिस्थितीत कोणीच फार मोठा उत्सव करून आनंद व्यक्त करू नये अशी इथल्या मोठमोठ्या पुढाऱ्यांची तसंच अगदी सामान्य माणसाचीही इच्छा होती; पण तिचा फारसा आदर करण्यात आला नाही. ८ जून, १५ जून व २२ जून १८९७ या दिवशीच्या 'केसरी'-मध्ये लोकमान्य टिळकांनी 'महाराणी सरकारचा जयजयकार' या शीर्षकाखाली तीन अग्रलेख लिहिले. या लेखामधून टिळकानी इंग्रजांच्या काळात या देशाची जी भरभराट झाली तिचा आढावा घेऊन म्हटलं आहे की, –'पण हे सर्व प्रकार दुसऱ्याच्या बायकोस नटविल्यासारखे झाले आहेत.' ६ जुलै १८९७ च्या 'केसरी' मध्ये एक कविता प्रसिद्ध झाली –

आबादानी अमुचि कथिली तुजला सेवकांनी
मत्स्यालागी कुशल कथिले वृत्त जैसे बकानी
नाही द्रव्य न वस्त्र नाहि नशिबी आरोग्य ते आमुच्या
बाकी सर्व सुखे प्रजेस अमुच्या माआक्षमाराणीच्या!

या कवितेमधूनही राणीच्या समारंभाविषयी नागरिकांमध्ये असलेली अप्रीती चांगल्या तऱ्हेने व्यक्त होते. स्वतः दामोदर चापेकरांनी आत्मवृत्तात म्हटलं आहे–

'जुबलीचा समारंभ ऐटीने करावयाचे सरकारचे मत होते. त्याप्रमाणे गावात किंबहुना सर्व हिंदुस्थानात हा जुबलीचा सण राजेरजवाड्यांनीसुद्धा मोठ्या जातीने पाळला. वास्तविक पाहिले असता ही वेळ आनंदोत्सव करण्याची नव्हती मुंबई इलाख्यात तापाची साथ, कलकत्त्यात धरणीकंप आणि सर्व हिंदुस्थानात भयंकर दुष्काळ अशी तीन प्रकारची भयंकर अनिष्ट अवस्था, गावात रयत दुःखी असताना ती रयतेची पीडा दूर न करता दुष्काळात तेरावा या म्हणीप्रमाणे त्याच्याकडून आपला साठावा वाढदिवस करून घेणे म्हणजे केवढा मोठेपणा होय! हे इंग्लंडच्या राणीवरच शोभणार आहे राजा आणि प्रजा याचे नाते पिता पुत्राप्रमाणे आमच्या शास्त्रात समजतात. त्या न्यायान ही आमप्रजची माता होय; पण हिच्या कृतीवरून हिला प्रजारक्षक माता म्हणण्यापेक्षा मुलाचा

फराळ करणारी खवीस का म्हणू नये ?'

याच संतापातून वाढदिवसाच्या दिवशी पुण्याच्या बुधवार चौकात महाराणीच्या फोटोला खेटराची माळ अडकवण्यात आली आणि रँडच्या वधासाठी मुहूर्त निवडला तो देखील ज्युबलीनिमित्त गणेशखिंडीतील राजप्रासादात जो भव्य उत्सव होणार होता त्या उत्सवाच्या रात्रीचाच– २२ जून १८९७ चा !!

तेव्हा चापेकरांनी रँडचा खून करण्याचं जे ठरवलं त्याला त्या वेळच्या प्लेगच्या साथीमध्ये गोऱ्या सोजिरांकडून जनतेवर होणाऱ्या अत्याचारांइतकीच किंबहुना त्याहूनही थोडी जास्त तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक कारणं आहेत; पण ' २२ जून १८९७ ' मध्ये या कारणांचं ओझरतसुद्धा दर्शन होत नाही. शिवाय २२ जूनला रात्री रँड जुबिलीसमारंभाहून परत येत असताना चापेकरानी आपली योजना पार पाडली हे खरं; पण त्या आधीही त्यांनी रँडच्या खुनाचे दोन-तीन प्रयत्न केले होते व ते फसले होते, हेही चित्रपटकर्त्यांनी प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न केलेला नाही.

याबद्दल बाकी कोणतंही सबळ कारण देता आलं नाही तरी चित्रपटाचे पाठीराखे शेवटी प्रत्येक माध्यमाला असणाऱ्या मर्यादांचं कारण पुढं करतील; ते मान्य करून या सर्व त्रुटींबद्दल चित्रपटनिर्मात्यांना माफ करता येईल; पण चित्रपटात ज्या महत्त्वाच्या घटना आहेत त्या तरी इतिहासाशी प्रामाणिक राहून, सुसंगतपणे चित्रित केल्या जाव्यात अशी अपेक्षा धरू नये काय ?

चित्रपटामध्ये असं दाखवलं आहे की रँड पार्टीहून बाहेर पडतो तेव्हा चापेकरांपैकी सर्वांत धाकटा भाऊ-वासुदेव– रँडच्या बग्गीमागे ' गोंद्या आला रे आला ' असं ओरडत धावत येतो व त्यातून दामोदर व बाळकृष्ण या भावांना इशारा देतो. बाळकृष्ण एका बग्गीवर चढतो. गोळ्या झाडतो. बग्गीतला साहेब पत्नीच्या अंगावर कोसळतो. पाठोपाठ दुसरी बग्गी येते. त्या बग्गीवर दामोदर चढतो. गोळ्या झाडतो. बग्गीमध्ये रँडसाहेब असतो. छातीवर हात दाबून तो बग्गीतच कोसळतो. हे सर्व चित्रण ऐतिहासिकदृष्ट्या संपूर्णपणे चुकीचं आहे.

स्वत: दामोदर चापेकरानी आत्मवृत्तात लिहिलं आहे–

' जेव्हा गाड्या शहरातून येणे सपले आणि परत शहरात गाड्या जाऊ लागल्या त्या वेळेस मी फाटकापाशी जाऊन उभा राहिलो. आमचे ठरले की मी गाडी पकडून आणावी आणि माझ्या बंधूनी (बाळकृष्ण) मला पिवळ्या बंगल्यापाशी काम करत असता मदत करावी. मी गाडीबरोबर धावत येत असतो. खुणेकरिता गोंद्या असा ध्वनी करावा आणि त्या ध्वनीवर बंधूनी समजावे की गाडी आली आणि त्यानी तयार असावे असा विचार होऊन मी फाटकाजवळ गेलो. बऱ्याच गाड्या गेल्यावर पाठीमागून ही गाडी आली. मी पूर्ण तऱ्हेने ओळखली आणि तिच्यापासून पंधरा पाऊले मागे पायी धावत चाललो. जसा पिवळा बंगला नजिक आला तसा मी गाडीस लगट करून गोंद्या असा ध्वनी केला. तो करताच माझा प्रिय बंधु मला येऊन मिळाला. मी गाडीचा पाठीमागचा पडदा गुंडी काढून उघडला आणि सुमारे वीतभर लावून निशाण मारले असावे.

' आमचे प्रथम असे ठरले होते की दोन्ही पिस्तुलं रँडसाहेबासच मारावी म्हणजे त्याच्या जीविताची शंका राहणार नाही. पण बंधु मागे राहिल्यामुळे माझ्या पिस्तुलाचे निशाण बघून रँडसाहेबाची गाडी निघून गेली. पाठीमागचे गाडीत कोणी आम्हाला पाहून कुजबुजत आहे असा संशय बधूस येऊन त्यानी गाडी पाठीमागून त्याच्या डोक्याचे निशाण धरून गोळी झाडली आणि आम्ही आलेल्या मार्गाने शीघ्र गतीने निघून गेलो. तरवारी दुसऱ्या दिवशी नेण्याचा आमचा विचार होता. घरी आल्यावर परमेश्वराचे अत्यंत आदरपूर्वक स्तवन केले. त्या रात्री आनंदामुळे आम्हास झोप आली नाही.'

' केसरी ' च्या २९ जून १८९७ च्या अंकात लोकमान्य टिळकांनी ' गेल्या मंगळवार रात्री घडलेला भयंकर प्रकार ' या शीर्षकाखाली २२ जूनला झालेल्या रँडच्या खुनाची हकीकत सविस्तर दिलेली आहे. या लेखात टिळक म्हणतात–

' सुमारे साडेअकरा वाजल्यापासून गव्हर्नरसाहेबाची पाहुणेमंडळी परत जावयास लागली. बारा वाजल्यानंतर काही मिनिटांनी रँडसाहेब तेथून आपल्या गाडीत बसून निघाले. यांच्यापुढे मुंबईचे केमिकल ॲनलायझर डॉ. बेरी याची गाडी होती व मागाहून ले. आयर्स्ट व त्यांची बायको यांची आणि त्यांच्यामागे ले. लुइस व सार्जंट याची मिळून दोन गाड्या होत्या. ले. लुइस व सार्जंट यांच्या गाडीचा घोडा हळू चालत होता, तो त्यांस न आवडून त्यानी गाडीवाल्यास गाडी लौकर हाकावयास सांगितली व ते पुढे निघून गेले. नंतर राहिलेल्या तीन गाड्या गव्हर्नमेंट हाउस सोडून सुमारे पाचसहाशे यार्ड पुढे आल्यावर तेथे कोणी इसमाने रँडसाहेबाच्या गाडीच्या मागे चढून त्याजवर छऱ्यांनी भरलेले पिस्तुल डाव्या खाद्याजवळ पाठीमागे झाडले; त्यामुळे ते तत्काळ बेशुद्ध होऊन पडले. नंतर थोड्या सेकंदानी दुसरा बार झाला व त्याने मागच्या गाडीतील ले. आयर्स्ट यांचा जागच्या जागी प्राण घेतला. ले. आयर्स्ट याच्या डोक्यातून गोळी पार निघून गेली व ते आपल्या बायकोच्या अंगावर पडले. हे दोन्ही बार सर्वांच्या पुढे डॉ. बेरी होते त्यानी व ले. आयर्स्ट यांच्या बायकोने ऐकले. बाराच्या आवाजाने घोडे बुजून गाड्या भरधाव सुटल्या. त्यात ले. आयर्स्ट यांची गाडी पुढे होऊन ती सर्वांच्या पुढे गेलेल्या ले. लुइसच्या गाडीवरून जात असता ले. लुइस यांनी ले. आयर्स्ट याच्या बायकोची ओरड ऐकून गाडी थांबविली आणि पाहतात तो आत ले. आयर्स्ट जखमी होऊन बेशुद्ध पडले आहेत. इतक्यात रँड याची गाडी तेथे आली. तेव्हा त्या गाडीत कोणी डॉक्टर भेटेल या समजुतीने ले. लुइस यानी आतल्या मनुष्यास विचारले व तो उत्तर देईना तेव्हा निजला असेल म्हणून गुडघा हलविला, तेव्हा तो कण्हावयास लागला, म्हणून पाहतात तो रँडसाहेब जखमी होऊन आत बेशुद्ध पडले आहेत. नंतर ले. आयर्स्ट यांच्या बायकोस गाडीतून काढून घेऊन दोघाही जखमी गृहस्थास त्याच्या गाड्यातून ससून हास्पिटलात पाठविले व मागून एका गाडीत दोन नर्सेस जात होत्या त्यासही तिकडे जाण्यास सांगितले. ही सर्व मंडळी हास्पिटलात पोचली तेव्हा एक वाजण्यास काही थोडी मिनिटे कमी होती.'

या वर्णनावरून त्या सबंध प्रसंगातील चित्तथरारक नाट्य लक्षात येतं. प्रत्यक्ष चित्रपटात मात्र हे नाट्य तर सोडाच, पण साध्या घटनाचा क्रमही दिग्दर्शकाला इतिहासाबरहुकुम ठेवता आलेला नाही.

पृष्ठ २० वर




लेखांक दुसरा

□

लेखकाच्या
मध्यपूर्वेतील
मनमुराद
भटकंतीवर
व
इराणमधील वास्तव्यावर
आधारलेली
नवी लेखमाला

# वाल्या दि फिशरमन

कावळ्याची काव काव कानावर पडली आणि जाग आली. इराणमधील पहिल्या पहाटेची सुरुवात काकरवानं झाली. ह्या काकाजींचा आवाज मात्र आपल्याकडील कावळ्यापेक्षा बराच खालच्या पट्टीचा आणि भारदस्त होता.

आळस झटकून मी खिडकीपाशी आलो. माझी खोली पाचव्या-सहाव्या मजल्यावर असणार. खिडकीसमोर सरळसोट झाडाची एक निष्पर्ण फांदी होती. खिडकीतून दूरवरचे डोंगर दिसत होते. उघडे नागडे. मातकट रंगाचे. झाडाचं तर नांवच नाही–गवताचं देखील पातं नाही. हिरवा रंग इस्लामचा आवडता, पण तेहरानला गराडा घालणाऱ्या डोंगरावर त्याची नामोनिशाणी देखील नव्हती !

कानावर पुन्हा खर्जातील काव काव आली. मी आवाजाच्या दिशेनं नजर वळवली आणि आश्चर्यचकित होऊन पहातच राहिलो. ह्या काकशास्त्रींचा रंग उजळ होता पंख चक्क पांढरे होते. रूप हुबेहुब कावळ्याचं. स्वर तोच. शरीर मात्र करड्या रंगाचं आणि पंख शुभ्र पांढरे. हा कावळा 'फ्रीक' तर नसेल ? पांढरा वाघ, पांढरं हरण–तसंच पांढरा कावळा ! मला एकदम 'कावळा म्हणे मी काळा, पांढरा शुभ्र तो बगळा' ह्या कवितेची आठवण झाली. 'मग विचार त्याने केला, एक पैशाचा साबु आणिला'– असला प्रकार तर ह्या कावळ्यानं केला नसेल ?

मी टक लावून पहातोय हे कावळ्यानं काण्या डोळ्यानं हेरलं. तो काहीसा चंचलचित्त झाला आणि कलकलाट करत उडाला. पाठोपाठ दहाबारा पांढरे कावळे वाळक्या फांद्या सोडून उडाले. सर्वांचे पंख पांढरे. मनात विचार आला इकडचा एखादा कावळा चुकून भारतामध्ये आला तर आपल्याकडील कावळिणीला 'काळी' म्हणून नापसंत तर करणार नाही ना ? पण कुणी सांगावं कदाचित उलटं देखील होईल. आपल्याकडील कावळिणीचं तुकतुकीत काळंभोर रूप पाहून हा अर्धपांढरा फिदादेखील होईल; पण समजा आपल्याकडील कावळा इकडं आला तर ? आपल्याकडं 'बी. ए. पाहिजे, गोरी पाहिजे.' हे फार. आपला कावळा तशापैकीच निघायचा !

फोनची घंटा किणकिणत होती. कावळ्यांचा नाद सोडून मी रिसिव्हर उचलला. पलीकडच्या आवाजानं सांगितलं की, अर्ध्या तासात ऑफिसची गाडी येईल, तयार रहावे.

मी झटपट दाढी उरकली. शॉवर घेतला. सफारी ड्रेस चढवला आणि नाश्ता संपवून हॉटेलच्या दरवाज्यात आलो. पहाटे एकरपोर्टला भेटलेलाच ड्रायव्हर आला होता. माझ्याकडं त्यानं एकदा चमत्कारिक नजरेनं पाहिलं. मीही त्याच्याकडे जरा आश्चर्यानंच पाहिलं. पहाटे

एअरपोर्टवर भेटला तेव्हा हा माणूस चुरगळलेला दिसत होता; पण आताचा त्याचा अवतार एकदम 'पॉलिशड्!' त्यानं अंगात भारी कापडाचा सूट घातला होता. कडक कॉलरचा पाढराशुभ्र शर्ट. सुटाला मॅचिंग सिल्क टाय्. चकचकित पॉलिश केलेले बूट आणि डोळयाला रेबनचा सोनेरी फ्रेमचा चष्मा. देवआनंद स्टाइलचा केसाचा भांग आपल्या कुठल्याही फिल्मी हिरोपेक्षा काकणभर सरस असा त्याचा थाट होता. चेहरा मात्र ओढलेला, काहीसा रडवेला आणि उदास.

पहेलवी रस्त्यावरून गाडी चालली होती. लांबच लांब रस्ता. दुतर्फा उंचच उंच झाडं. गाड्याची लांबच लांब रांग. पायी चालणारं फारसं कुणी दिसतच नव्हतं...आणि जे दिसत होतं ते मात्र एकदम लक्ष वेधून घेणारं होत. मुली, बाया–सगळयाचा अवतार फॅशन मॉडेल सारखा. बहुतेक जणी काहीशा बुटक्या आणि नाजूक–पायांत सहा–सहा इंच जाडीचे सोल असलेले उंच टाचांचे बूट. त्यामुळे त्याचं चालणं काहीसं अवघडल्यासारखं, तोल सावरत तरंगल्यासारखं, शरिराच्या विशिष्ट भागाला हिंदोळे देणारं–म्हणूनच पहाण्यासारखं. अतिशय बारीक कमर. दोन्ही हातांच्या पंज्यात सहज मावेल अशी. पण कमरेखाली आणि वर मात्र सर्व एकदम ठसठशीत; नजरेत भरून साडणारं. 'अवर ग्लास फिगर' ती हीच! वालुकायंत्र जसं मध्यभागी चिंचोळं आणि वर–खाली घुमारदार असतं त्याप्रमाणे.

बहुतेकांनी मिनीस्कर्ट घातलेले. जरा जास्त मिनी. क्वचित एखादा मिडी नजरेस पडायचा. अंगांत तंग ब्लाऊज आणि त्यावर हलकासा स्वेटर. अधूनमधून जीन्स देखील दिसायच्या; पण इतक्या वाईट की, पहावं म्हटलं तरी त्रास आणि न पहाणं सर्वस्वी अशक्य. चालणं मेरलिन मन्रोच्या धर्तीचं. सगळंच कठीण. इतक्या टाइट जीन्स घालण्यापेक्षा न घातलेल्या बऱ्या!

गाडी पहेलवी रस्त्यावरून काहीशी वेगानंच चालली होती. पुण्यातील रिक्षावाल्यांप्रमाणे हा ड्रायव्हर इतराना हुलकावण्या देत, अधूनमधून एखादी शिवी हासडत गाडी दामटत होता. भगव्या रंगाच्या 'पेकान' टॅक्सिज् ह्या रांगेतून त्या रांगेत घुसत 'पाशिंजर' उचलत आट्यापाट्या खेळत होत्या. टॅक्सीची पद्धत काहीशी विचित्र दिसत होती. फुटपाथवर वाट पहाणाऱ्या पॅसेंजर-जवळ क्षणकाल टॅक्सी स्थिरावायची–पॅसेंजर मोठ्यानं ओरडून कुठं जायचं ते सांगायचा. टॅक्सी त्या बाजूने जाणार असेल तर त्याला आत घेतलं जायचं. नसेल तर टॅक्सीवाला मान उडवून चालू लागायचा. एकाच टॅक्सीत वाटेवरले चार – पाच एका दिशेला जाणारे प्रवासी घेतले जायचे.

नागमोडी पळणाऱ्या टॅक्सिज, बेभानपणे धावणाऱ्या खाजगी गाड्या, अगावर येणाऱ्या अजस्र बसेस् ह्यातून कौशल्यानं मार्ग काढत आमची गाडी पहेलवी रस्ता काटत होती. ड्रायव्हरचा चेहरा जास्तच रडवेला दिसत होता. त्याचं सुस्कारे सोडणं आणि अल्लाच्या नावानं पुटपुटणं चालू होतं. त्याकडे शक्यतो दुर्लक्ष करून मी रस्त्याचे दोनही फुटपाथ न्याहाळत तेहरानचं पहिलंवहिलं दर्शन घेण्यात दंग झालो होतो.

रस्त्याच्या दुतर्फा अनेक गगनचुंबी इमारतींचं बांधकाम चालू होतं. सर्वत्र मोठाली क्रेन्स नजरेस पडत होती. वीस–पंचवीस मजले-त्यावर आणखी मजले चढवले जात होते. इराण म्हणजे मातीची घरं, बुरखा घालणाऱ्या बाया आणि उंटांचे काफिले अशी सर्व-साधारण समजूत, पण तेहरान तर एखाद्या युरोपमधील शहराप्रमाणे भासत होतं. निदान प्रथम दर्शनी वरवरचं स्वरूप तरी तसं दिसत होतं. अधूनमधून पूर्ण झालेली एखादी इमारत नजरेस पडायची. उंचच उंच–पण वास्तुशिल्प अगदी बटबटीत! वास्तविक इस्लामिक वास्तुशिल्पकला जगप्रसिद्ध; पण जे दिसत होतं ते मात्र ओंगळ! कुठल्या तरी थर्ड ग्रेड अमेरिकन किंवा युरोपियन आर्किटेक्टनं डिझाइन देऊन अमाप पैसा खाल्ला असावा!

सर्वत्र नुसतं बांधकामच बांधकाम. सिमेंट कॉंक्रीटचं अपूर्ण जंगल. 'ऑइल बूम' म्हणजे काय ह्याचा थोडाफार अर्थ कळत होता. खनिज तेलाच्या विक्रीतून अमाप पैसा मिळवणारा हा देश–सर्वत्र झटपट अर्वाचीन सस्कृती आणि समृद्धी निर्माण करण्याचा प्रयत्न, नतनी-करण, नविनीकरण, आधुनिकीकरण...सर्वत्र पैशाची ताकद स्पष्टपणे नजरेस पडत होती.

हॉटेल सोडून जवळजवळ अर्धा तास लोटला होता तरी ऑफिस येत नव्हतं. पहेलवी रस्ता संपत नव्हता. ड्रायव्हरचे उसासे, सुस्कारे वाढतच होते. मला वाटलं ह्याच कुणी तरी मेलं असणार म्हणूनच हा इतका दुःखी दिसतोय. त्याला बोलतं करावं म्हणून मी प्रश्न केला,

'युवर नेम–तुझं नाव?'

'हैदरी–लाबलचक सुस्कारा सोडत त्यानं जबाब दिला. मौन मोडल्याबद्दल त्याला घुस्सा आला असावा.

अल्लाला काही तरी पुटपुटून सांगत, समोरून येणाऱ्या एका भल्यामोठ्या मिलिटरी ट्रकला सफाईनं चुकवून, बाजूच्या टॅक्सीला ऑव्हरटेक करताना एक इरसाल शिवी हासडून त्यानं मला प्रति-प्रश्न केला, 'युवर नेम?', मी उत्तर दिलं. त्याला नावाचा उच्चार जमेना. शब्द वेगवेगळ्या प्रकारे चावून पाहिले तरी त्याला 'ळ'चा उच्चार जमेना. खूप प्रयत्न केल्यानंतर शेवटी माझं नाव 'आगा-ए-विजे' असं ठरल. तो काहीसा खुष झाला. ताबडतोब त्यानं दुसरा प्रश्न केला 'हिंदी? पाकिस्तानी?' मी उत्तर दिलं 'हिंदी!'

उत्तर देताना माझं मलाच काहीसं वेगळं वाटलं. कारण सर्व-सामान्यपणे ह्या प्रश्नाचं उत्तर 'इंडियन' असं देण्याची जिभेला सवय. हिंदी म्हणजे–न झालेली राष्ट्रभाषा. एरवी नॅशनॅलिटी विचारल्यानंतर हिंदी–म्हणजे हिंदू वगैरे शब्द उच्चारणं जरा अव-घडच. स्वतःच्या देशातच अवघड–बाहेर तर सोडाच!

हिंदू म्हटलं की गाईला नमस्कार करणारा, गाईचं मूत पिणारा, तेहतीस कोटी सवालक्ष देवाना पुजणारा आणि प्रतिगामी का काय म्हणतात तसा. आपले नायपॉल, निराद चौधरी किंवा परदेशी वृत्त-पत्रकार ज्याची रसभरित वर्णनातून टिंगलटवाळी करतात तो हिंदू म्हणजे हिंदुस्थानचा हा अर्थ रूढ झालाच नाही. होऊच दिला नाही!

पण इथं हा इराणी मला सरळ सरळ सवाल करत होता 'तू हिंदुस्थानचा हिंदू की पाकिस्तानचा मुसलमान? त्याचा प्रश्न होता दोनच शब्दाचा 'हिंदी? पाकिस्तानी?'–पण गर्भितार्थ वरील वाक्यामधला आणि मी देखील नकळत सहजपणे उत्तर दिलं होतं–

'हिंदी !' का कुणास ठाऊक पण एकदम कसं मोकळं मोकळं वाटलं उत्तर दिल्यानंतर. अनेक वर्षांपासून कुणाला तरी हे सांगावं; पण ऐकणाराच भेटू नये आणि मग अचानक कुणी तरी नेमका हवा असलेला प्रश्न विचारावा आणि अनेक वर्षं साचून राहिलेली वेदना केवळ एक शब्द उच्चारून नाहीशी व्हावी तसा काहीसा प्रकार. ड्रायव्हरची रडकी सूरत आता बरीचशी हसरी झाली होती 'हिंद खैली बुजुर्ग–गांधी आदम खैली खुब' वगैरे त्याचं सुरू झालं. हिंदबद्दल रंगात येऊन तो बरंच काही बोलत होता अगदी नरगिस–राजकपूर ह्यांच्या 'आवारे' पासून ते बानू इंदिरापर्यंत. संधी मिळताच मी त्याला विचारलं—

'मगा तू इतका दुःकी का दिसत होतास ? काय झालंय ?

तुला बर नाही का ? तुझ्या घरी कुणी आजारी आहे का ?

कुणाची 'मौत' झाली आहे का ?'

हैदरीला वेगवेगळ्या प्रकारानी हावभावानी मी हे प्रश्न विचारत होतो. प्रत्येक प्रश्नाला तो लाजत–बुजत, हसत नो–नो–अशी उत्तरं देत होता आणि मग एकाएकी मेंदूत प्रकाश पडल्याप्रमाणे त्यानं मानेला झटका दिला आणि चेहरा गंभीर आणि रडवा करून तो म्हणाला,

'आगा–ए–विजें–आजपासून रमझान सुरू. मी रोझे धरलेत–नो फुड–'

आणि मग पुनश्च सुस्कारे टाकत, उसासे सोडत, मधूनमधून अल्लाशी कानगोष्टी करत रडव्या चेहऱ्यानं तो गाडी चालवू लागला. रमझानची तर सुरुवात झालेली. आजपासूनच रोझे धरलेले, म्हणजे सकाळचा नाश्ता न घेतल्याला फार तर दोन तास झाले असतील. म्हणजे खरा उपवास अजून सुरू व्हायचाच होता. आताच ह्या पठ्ठ्याची अशी हालत, मग रमझान संपेपर्यंत ह्याचं काय होणार ? मला उगाचच त्याची काळजी वाटू लागली. मनात आलं त्याला सांगावं 'बाबा रे, इतका त्रास होणार असेल तर कशाला रोझे धरतोस–कशाला उपवास करतोस–' पण विचार केला उगाच त्याच्या धार्मिक बाबतीत आपण ढवळाढवळ करू नये. धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब. दुसऱ्यानं त्यात नाक खुपसलं की गोंधळ होतो.

शेवटी एकदाचं ऑफिस आलं. दरवाज्यावर कमरेला पिस्तुल लावलेले, निळ्या युनिफॉर्ममधील दोन तगडे गार्ड होते. मला वाटलं हे आपल्याला सॅल्यूट मारणार; पण झालं उलटच. त्यांपैकी एकानं मला दरवाजातच अडवलं आणि पासपोर्ट मागितला. आतापर्यंत कुठल्याही देशात (अमेरिका सोडून) युनोच्या ऑफिसात जाण्याअगोदर गार्डला पासपोर्ट दाखविण्याचा प्रसंग आला नव्हता. पासपोर्ट पाहून झाल्यावर त्या गार्डनं मला ब्रीफकेस उघडून दाखविण्याची सूचना केली. तेव्हा मात्र मी भडकलो. साफ नकार दिला. गार्डनं चमत्कारिक नजरेनं मला आपादमस्तक न्याहाळलं. मला त्याच्या अपमानास्पद नजरेनं आणखीनच चीड आली.

ड्रायव्हर हैदरी आणि गार्डची मग बरीच काही बोलाचाली झाली. गार्डन 'चष्म्–चष्म्' म्हणत डायल फिरवून कुणाला तरी फोन केला. एकदोन वेळा 'बाऽले–बाऽले' म्हणून उद्धट स्वरात 'आगाऽऽ' अशी हाक मारून माझ्या हाती रिसिव्हर दिला. मी फोनवरून तडकून काही बोलणार इतक्यात पलीकडून बोलणारी सेक्रेटरी अतिशय लाडिक आवाजात म्हणाली, 'तुम्ही तिथच थांबा– मी तांबडतोब खाली येते– आलेच एक मिनिटात !'

मी रिसिव्हर खाली ठेवताच हैदरीनं प्रचंड उत्सुकतेनं प्रश्न केला, 'मुसाफिरात कधी सुरू होणार– टूरवर कधी निघायचं ? इस्फहान–शिराझची सफर कधी ?' मी काहीसं वैतागून म्हणालो 'अरे बाबा, अगोदर ऑफिसमधे तरी जाऊ दे मला– मग बघू कुठं कुठं आणि केव्हा जायचं ते.'

हैदरीचा चेहरा पडला. त्यानं कोटाच्या खिशातून पिवळ्याजर्द मण्याची जपाची माळ काढली आणि हिरमुसलेपणानं तो मणी ओढू लागला. अद्ययावत मॉडर्न सुटाबुटातील हैदरीला उदास चेहऱ्यानं माळेचे मणी ओढताना बघून मला हसू फुटलं. ते दृश्यच विनोदी होतं. पंढरीचा वारकरी सूटटाय घालून दिंड्या-पताकांच्या गजरात ग्यानबा–तुकाराम करू लागला तर कसं दिसेल ! मी हैदरीला विचारलं, 'हे काय आहे तुझ्या हातात ?' 'तस्पी !' मणी हाताळत गंभीरपणे त्यानं उत्तर दिलं आणि मला सवाल केला, 'हिंदमधे हे नाही काय ?–तुझ्याकडे ?–तुम्ही तस्पीला काय म्हणता ?' माझं उत्तर ऐकून 'जपाच्‌माल जपाच्‌माल' म्हणत खांदे उडवत हैदरी आणखीनच खिन्न चेहऱ्यानं मणी ओढू लागला.

समोरच्या स्वयंचलित लिफ्टचा दरवाजा उघडला आणि एक अप्रतिम देखणी पर्शियन तरुणी तरंगत तरंगत माझ्याजवळ आली. माझ्याकडं काहीसं आश्चर्यानं बघत हस्तांदोलनासाठी हात पुढं करत म्हणाली–

'मीऽऽस्टर पाऽऽर– उल्– कार....आयेम् हमीदे–'


तिनं गार्डकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला. सूचनावजा दम भरला आणि आम्ही लिफ्टमधे शिरलो. दार बंद होण्याअगोदर हैदरीनं हमिदेला विचारलं, 'टूर कधीपासून सुरू होणार ?' हमीदेनं उत्तरादाखल नुसतीच मान उडवली. ह्या हैदरीला टूरची एव्हढी घाई का झालीय मला कळत नव्हतं.

लिफ्टचं दार बंद झालं. लिफ्ट फ्रेंच अत्तराच्या सुगंधानं धुंद. इमारत फक्त पाच मजली. ही इमारत शंभर-दीडशे मजली नाही म्हणून माझं मन हळहळत होतं.

– हमिदे अणकुचीदार उंच टाचा टुचु टुचू वाजवत कॉरीडॉरमधून निघाली. मी तिच्या पाठोपाठ ऑफिसमधे शिरलो. स्वागतकक्षातील एका उबदार गुबगुबीत खुर्चीत मला बसवून हमीदे आपल्या टेबलामागे बसली. आपल्या नाजुक बोटांनी डायल फिरवून तिनं दोन तीन फोन केले. टेबलावरील पत्रांचे गठ्ठे तपासले आणि माझ्याकडून आयडेंटिटी कार्डसाईझचे तीन फोटो मागून घेतले.

–एक फोटो कार्डवर चिकटवून तिनं ते कार्ड शेजारच्या एका कॉम्प्युटरसारख्या मशीनमध्ये घातलं. काही बटण दाबलो. क्षणार्धात वजनाच्या काट्यामध्ये नाणं टाकताच जस तिकिट पटकन बाहेर येतं तसं ते कार्ड आलं. कार्ड माझ्या हाती देत हमिदे म्हणाला–'हे दाखवलंस की तुला कुठलाही गार्ड अडवणार नाही– आमच्या इथं हे सेक्युरिटी आणि बंदोबस्तप्रकरण फार आहे–' हमिदे टेबलामागे बसून फायलिंगचं काम करू लागला आणि मी तिच्याकडं पहात बसून राहिलो.

# लग्न नको




हे बंधन कायदेशीर आहे.
आपल्या मुलांच्या हिताच्या दृष्टीने
हे योग्यच आहे.
बोहल्यावर चढण्यापूर्वी
त्यांना आपल्या जबाबदारीची
पूर्ण जाणीव होऊ द्या.

davp 80/121

दिसायला ती एखाद्या फ्रेंच नटीसारखी होती. नाजुक पण सेक्सी. जिवंत ताबूस गोरा रंग· लांबसडक सोनेरी केस रेशमासारखे–' 'इस तरहा झुल्फ न सुलझाया करो–' भिवया अगदी कोरीव आणि धनुष्याकृती. त्यांचा रंगदेखील रेशमी सोनेरी. पापण्यांना हिरवट रंगाची आयशॅडो. पापणीच्या केसांना मस्कॅरा. निळसार झाक असलेले बदामी आकाराचे डोळे त्यामुळे जास्तच मोठेमोठे वाटत. नाक तरतरीत. चेहरा रेखीव. कपाळावर मात्र अनाकलनीय अशा एक दोन सूक्ष्म आठ्या. लिपस्टिक जरा जास्तच भडक. त्यामुळे जिवणी पसरट दिसायची–जॅकी केनेडीसारखी. हृमिदे पत्राचे लिफाफे उघडून, तारीख, नंबर घालून पत्रं फाइल करीत होती. लांबसडक बोटांची नखं जरा बाजवीपेक्षा वाढविलेली, अणकुचीदार आणि लालभडक रंगवलेली. एकूण मेकअप् जरा जादाच. लावून बरा दिसणारा–जवळून पाहिल्यास कदाचित पावडरचे थर दिसले असते !

एका मिशाळ माणसानं 'सलाम आगा' म्हणत माझ्यासमोर एका अगदी नाजूक आणि छोट्या नक्षीदार पेल्यामध्ये चहाचा अर्क ठेवला. पेल्याशेजारी त्यान काचेचं सुबक भांडं ठेवलं. त्यात साखरेचे खडे होते. हृमिदेसमोर देखील त्यानं तसलाच चहाचा पेला आणि साखरेचं भांडं ठेवलं.

पेल्यात चमचा नव्हता. चहा होता तोदेखाल अर्धा घोट आणि बिनदुधाचा साखरेचा. खडा टाकला तरी ढवळायचा कशानं? मला माओची म्हण आठवली. 'It is not the sugar but stirring that makes the tea sweet–' हृमिदे काय करते म्हणून मी उत्सुकतेनं पाहू लागलो.

तिनं पत्रावरची नजर उचलून माझ्याकडे पाहिलं. मंद हसून मला चहा घेण्याचा आग्रह केला; मग पर्स उघडून एक औषधाची छोटीशी बाटली काढली. एक गोळी तळहातावर घेऊन तोंडात टाकली. पाठोपाठ साखरेचा खडा तोंडात धरून चहाचा घोट घेतला. सकाळी सकाळी ही तरुण पोरगी कसली गोळी घेत असावी? कुटुंबनियोजनाची 'पिल्' तर नसावी? हृमिदेला माझ्या मनातील प्रश्न समजला असावा. काहीसं ओशाळवाणं हसत ती म्हणाली, 'तेहरानमध्ये जिंदगी दिवसेंन्दिवस मुष्कील होत चालली आहे – मागील महिन्यात मी प्रचंड मानसिक ताणानं आजारी होते–डिप्रेशन–डॉक्टरनं आता ह्या गोळ्या खायला सांगितलंय–व्हेलियम–ट्रँक्विलायझर आहे–दिवसातून चार वेळा–' आणि मग कुठं तरी शून्यात बघत ती हरवल्यासारखी बसून राहिली. तिचा सुंदर चेहरा एकाएकी अतिशय केविलवाणा दिसू लागला. तिच्या कपाळावरील सूक्ष्म आठ्यांचं कोडं उलगडलं. मी तोंडात साखरेचा खडा धरून चहाच्या सुगंधी अर्काचा घोट घेतला आणि सिगरेट पेटवली. ह्या हृमिदेला कसलं एव्हढं टेन्शन असेल? वास्तविक इतक्या सुंदर मुलीमुळं इतराना टेन्शन यालं पाहिजे.

ऑफिसमध्ये वर्दळ सुरू झाली. झकपक पोषाख केलेल्या सुटाबुटातील इराणी माझ्याकडे नजर जाताच काहीसा चमकायचा. हृमिदेला 'सुब्हा खैर' म्हणून रजिस्टरवर सही करून आपल्या टेबलापाशी जायचा. ही सारी इराणी माणसं सकाळपासून माझ्याकडे नजर जाताच असं चमकतात का? त्यांच्या शोधक नजरेनं मला उगाचच अस्वस्थ वाटू लागलं.

गुबगुबीत खुर्चीतून उठून मी हृमिदेच्या टेबलासमोरील खुर्चीत जाऊन बसलो फ्रेंच अत्तराच्या सुगंधानं मन पुन्हा थोडं उल्हासित झालं. प्रॉजेक्ट मॅनेजर अजून आला नव्हता. हृमिदे एखाद्या कळसूत्री बाहुलीसारखी बसून होती. मी बोलण्यासाठी तोंड उघडणार इतक्यात तिनंच प्रश्न केला –

'मी ऽऽ स्टर पा ऽ र – उल् – कार तुम्ही रामायाना वाचलंय? रामा, लक्शमना, सी ऽ ऽ ता ह्याची सारी कहानी तुम्हाला माहीत आहे – ?'

'हो' – मी सिगारेटची राख झटकत उत्तर दिलं.

ह्या इराणी पोरीला रामायणाबद्दल एवढी चौकशी कशासाठी? तिच्यावर मानसोपचार करणाऱ्या डॉक्टरनं विरंगुळा म्हणून तर तिला रामायण वाचण्याचा सल्ला दिला नसेल? किंवा अनोळखी भारतीयाबरोबर दुसरं काय बोलावं ह्याची अडचण वाटून केवळ औपचारिकपणा म्हणून तर ती रामायणाबद्दल चौकशी करत नसेल? हृमिदेन पुन्हा सवाल केला –

'तुम्हाला वॉल्मिकीबद्दल माहिती आहे?'

आता मात्र कमाल झाली त्या पोरीची. मला हसू आवरेना. मी म्हणालो. 'मला रामायण माहीत आहे. वाल्मिकी माहीत आहे... पण तुला त्याच्याशी काय करायचं आहे?'

'मला वॉल्मिकीची गोष्ट सांगाल?'

'हो –'

'आता सागाल ?'

.'आत्ता ?'

'हो – हो – आत्ता प्लीज आत्ता सांगा !' हृमिदे काकुळतीनं विनवू लागली.

सकाळी उठून ट्रँक्विलायझर खाणारी ही पोरगी वेडीबिडी तर नाही ना, असा मला संशय येऊ लागला. बँकॉकहून पाच हजार मैलांवरून मी इथं आलो होतो ते अॅग्रिकल्चरल् मार्केटिंगच्या प्रॉजेक्टच्या कामासाठी आणि पहिल्या भेटीतच सकाळी सकाळी ही पर्शियन तरुणी वाल्मिकीच्या गोष्टीचा आग्रह धरून 'आत्ताच्या आत्ता सागा' असा हट्ट करत होती. कमाल आहे !

हातामध्ये पेन आणि पॅड घेऊन गोष्ट लिहून घेण्याची तयारी करून हृमिदे म्हणाली –

'कृपा करून थट्टा करू नका..अहो, उद्या माझी परीक्षा आहे. मागील वर्षापासून युनिव्हर्सिटीनं शहनशहाच्या फर्मानानुसार भारतीय,प्राचीन वाङ्मयावर आधारित एक पेपर कंपलसरी केला आहे. मी वर्षभर रामायाना वाचल आहे. रामानं सीतेला तलाक दिला. तिला आगीतून चालायला लावलं...रावानाला मारलं..ते सगळं मला माहीत आहे ..पण उद्या जर परीक्षेत रामायानाचा नविसादे (लेखक) वॉल्मिकीबद्दल प्रश्न आला तर तो दरवडेखोर होता ह्यापलीकडे मला काहीच लिहिता येणार नाही...मी नापास होईन.. म्हणून तुम्हाला विचारलं...प्लीज मला वॉल्मिकीची गोष्ट सागा.'

हृमिदे वेडसर नाही हे ध्यानात आल्यावर माझा जीव भांड्यात पडला. मी मग वॉल्मिकी ऊर्फ वाल्याकोळ्याची गोष्ट तिला सांगू

लागलो. ती शॉर्टहँडमध्ये भरभर लिहून घेऊ लागली. गोष्ट संपली तेव्हा हमिदे भयंकर खुष झाली खुर्चीवरून जवळजवळ उडी मारून माझ्या नजदीक येऊन, फार्सीमध्ये हजार वेळा आभार मानत तिनं जवळजवळ मला मिठीच मारली !

वेळ मिळताच तिला तुलसिदासाचं संपूर्ण रामायणच काय अगदी गीतरामायण देखील गाऊन दाखवायचं असं मी मनाशी ठरवत असतानाच प्रॉजेक्ट मॅनेजर 'गुडमॉर्निंग' म्हणत आत शिरला. माझ्यापासून दूर होत हमिदेनं ओळख करून दिली– 'मिऽऽस्टर जिम्-धिस इज् मीऽऽस्टर पाऽरूल्कार– माय व्हेरी गुड फ्रेंड !' जिम चाट.

जिमच्या पाठोपाठ मी त्याच्या खोलीत गेलो. मला वरपासून खालपर्यंत न्याहाळत जिम् वारंवार 'आश्चर्य आहे.' 'आश्चर्य आहे' असं म्हणत काहीसा विचारमग्न झाला. नंतर एकदम माझ्या खांद्यावर थोपटत म्हणाला,

'तुझा हा सफारी ड्रेस बँकॉकचा दिसतोय– एकदम कंफर्टेबल.... अरे, मला सुद्धा सफारी घालायला आवडेल...पण इथं चालणार नाही. इराणमध्ये टाय आणि सूट कंपलसरी आहे...'

सारे इराणी माझ्याकडे चमकून का पहात होते त्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं. ड्रायव्हरपासून चहावाल्यापर्यंत प्रत्येकजण सुटाबुटात का वावरत होता हे देखील समजलं होतं. विकास आणि प्रगतीच्या नावाखाली पाश्चिमात्यांचं हे उघड उघड अंधानुकरण होतं. मी जिमला म्हणालो–

'हे बघ जिम्, मी फील्डवर काम करणारा माणूस...टाय, सुटात मला गुदमरल्यासारखं होतं...अरे, बँकॉकमध्ये तर आम्ही सारे साध्या बुशशर्टमध्ये वावरतो– अगदी थायलंडचे मंत्रीदेखील. अगदी एखादा फार मोठा समारंभ असला तरच टाय आणि सूट किंवा राष्ट्रीय पोषाख–'

मी दिलेली सिगरेट पेटवत जिम म्हणाला,

'तुझं म्हणणं खरं आहे रे बाबा– मलादेखील हे सतत टायसूट घालून वावरणं आवडत नाही. एक जीन्स आणि टीशर्ट घालून काम करावं; पण इराणी अधिकाऱ्याना ते अजिबात आवडणार नाही. माझ्या ऑफिसमध्ये बघितलंस ना, सगळेजण सुटबुट घालून नवरदेवासारखे खुर्च्यांवर बसून आहेत. शेतीविषयक आमचं प्रॉजेक्ट. ते असं सुटबुट घालून कसं काय होणार? पण विचार कोण करणार? इथं खरं काम कुणालाच करायचं नाही. येईल तुझ्या ध्यानात हळूहळू. मी आपला सूचना दिली. जमलं तर सूट वापर. तुझं तू ठरव. मी कोण तुला पोषाखाबद्दल उपदेश करणारा ?–' आणि मग हसत हसत काहीसं आठवल्यासारखं जिम म्हणाला–

'अरे, पहिल्या भेटीतच तुझं हमिदेशी कसलं एव्हढं अफेअर चालल होत? महाशिष्ट मुलगी ती. कुणाकडे कधी चुकून हसूनदेखील बघणार नाही. सदा कपाळाला आठ्या...आणि बघावं तर ती अगदी तुझ्या गळ्यात पडू पहात होती–'

डोळा मारत मी म्हणालो,

'जिम् ही सगळी वाल्या द फिशरमनची कृपा आहे. तुला नाही ते समजायचं. तू आपलं कामाचं काय ते बोल. मग नंतर कधी तरी सवडीनं तुला वाल्या कोळ्याची गोष्ट सांगीन !'

# सर्फराज....दि मॉडर्न

खनिज तेलाच्या जोरावर इराण पाश्चिमात्यांच्या धर्तीवर औद्योगिक सुधारणेच्या मागे लागला होता तरी इतर आशियायी देशांप्रमाणेच हा देश देखील कृषिप्रधान, हे लक्षात घेण्यासारखं. दोनतृतियांश प्रदेश वाळवंटी. उरलेला बराचसा मुलुख डोंगराळ आणि पहाडी. लागवडीयोग्य जमीन अगदी कमी. तशात पाण्याची कमतरता; पण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये क्रांती घडवून आणण्याचं शहनशहाचं स्वप्न होतं. अनेक स्वप्नांपैकी हे एक स्वप्न. हा स्वप्नवेडा राजा दिवास्वप्ने पहाणाऱ्यांपैकी नव्हता. प्रत्येक स्वप्न खरं करून दाखविण्याची त्यानं जणू 'कसम' खाल्ली होती.

शेतीविषयक संशोधनासाठी इराणच्या चारी कोपऱ्यात सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यात आल्या होत्या· देशी–परदेशी शास्त्रज्ञांच्या मदतीने शेतीला उपयुक्त असे शोध लावण्यासाठी सरकारच्या खजिन्यातून अमाप पैसा ओतला जात होता; पण सगळे इराणी शास्त्रज्ञ सुट–टायमध्ये अडकून पडले होते की काय न जाणे. म्हणावी तशी प्रगती होत नव्हती. शेतकऱ्याची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली होती. महागाई वाढत होती. शेतकऱ्याच्या गरजेच्या वस्तूंच्या किंमती वाढत होत्या...त्याच्या शेतमालाला अगदी सरकारनं बांधून दिलेला भाव देखील परवडेनासा झाला होता. शेती किफायतशीर ठरत नव्हती. उत्पादन घटत होतं. मटणापासून, गहू, तांदूळ, साखर वगैरे सर्वच अन्न परदेशातून भरमसाठ किंमत देऊन आयात करावं लागत होतं. सामान्य माणसाला आयात केलेल्या पदार्थांच्या किंमती परवडत नव्हत्या. त्याला उत्तर म्हणून पगारवाढ, महागाईभत्त्यात वाढ दिली जात होती. प्रजला सुखोसमाधानी ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न चालू होता. एकीकडे प्रचंड वेगानं चालवलेलं औद्योगीकरण, दुसरीकडे ढासळत चाललेली अर्थव्यवस्था ह्या गुंत्यामध्ये इराण अडकला होता. पैसा अमाप होता; पण त्यातून उत्पादक असं काही घडत नव्हतं. बुटाच्या चकचकीत पॉलिशवर जरा सुद्धा धूळ बसू नये ह्याची सतत काळजी वाहणारा इराणी, हात काळे होतील म्हणून मशिनरीला शिवत नव्हता. कपड्याची इस्त्री बिघडेल म्हणून ट्रॅक्टर चालवत नव्हता. चिखलाचे डाग पडतील म्हणून मातीपासून दूर रहात होता. त्याचा शहनशहा दिवसाचे अठरा अठरा तास काम करून देशाला एका महान् नव्या संस्कृतीप्रत नेण्यासाठी झिजत होता. आज त्याच्या सगळ्याच स्वप्नांचा चुराडा झाला आहे. आज तरी जग ह्या पैगंबरवासी शहाकडे एक जुलमी आणि व्यभिचारी राजा म्हणूनच पहातंय !

– जिम ह्या शेतमालाचं व्यवस्थापन आणि वितरण ह्या क्षेत्रातील तज्ज्ञ. इराणमध्ये शेतीच्या पारंपारिक पद्धतीमध्ये आवश्यक ती सुधारणा घडून येत होती; पण मार्केटिंग मात्र अजूनही जुन्याच पद्धतीनं चालायचं. नाशवंत शेतमाल पाठविण्याची पद्धती अजूनही पारंपारिकच

होती. त्याचप्रमाणे दलाली मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. शेतकऱ्याच्या मालाच्या वजनाच्या बाबतीत, शेत मालाचा दर्जा ठरविण्याच्या बाबतीत अनेक प्रकारची फसवाफसवी होती. थोडक्यात काय तर आपल्याकडे जे आहे तेच सर्व इराणमध्ये चालू होतं. इथ संप आणि मोर्चे वगैरे शक्य होतं. इराणमध्ये मात्र शेतकऱ्याला (किंवा इतरांना) दबाव आणण्याचं कुठलंच साधन उपलब्ध नव्हतं.

जिमच्या प्रॉजेक्टचा अभ्यास करून शेतकऱ्याच्या अडचणी स्पष्ट करणाऱ्या दोन्ही फिल्मस आणि स्लाइडस् कृषिमंत्री आणि त्याच्या अधिकारीवर्गाच्या प्रशिक्षणासाठी तयार करायच्या होत्या. आपल्या खात्यातील अधिकाऱ्याना अशा शिक्षणाची गरज आहे हे कृषिमंत्र्यांना पूर्णपणे मान्य होतं. (आपल्याकडे हा सुदिन कधी उगवेल ?) अधिकारीवर्गाला प्रशिक्षण देण्यासाठी 'कम्युनिकेशन मटेरियल्स' ज्याप्रमाणे तयार करायची होती त्याचप्रमाणे शेतकऱ्याला सुधारित व्यापारी तंत्राचं शिक्षण दृक्-श्राव्य माध्यमाद्वारा देण्यासाठी अनेक कार्यक्रमांची आखणी करावयाची होती. काम अत्यंत अवघड होतं.

दिवसभर जिमबरोबर चर्चा चालू होती. अनेक प्रश्न मी विचारत होतो. नोटस घेत होतो. वारवार इराणचा नकाशा अभ्यासत होतो. अखेरीस पहिल्या पधरा दिवसाच्या दौऱ्याचा कार्यक्रम निश्चित करून रात्री वाचण्यासाठी गठ्ठाभर पेपर्स आणि फाइल्स् घेऊन हॉटेलवर परतलो.

रात्रभर फाइल्स चाळल्या. झोपण्यापूर्वी बायकोला चार ओळींचं पत्र लिहिलं. इराणमधला पत्रव्यवहाराचा पत्ता कळवला आणि झोपी गेलो. स्वप्नामध्ये कांदे, बटाटे, टॉमॅटो, वांगी, फ्लॉवर, कोबी चित्रविचित्र आकार धारण करून वॉल्ट डिस्नेच्या कार्टून फिल्मप्रमाणे फेर धरून नाचत वेगवेगळी गाणी म्हणत होते. मधूनच वाल्या कोळ्याप्रमाणे दिसणारा कोणी तरी ह्या सर्वांना पकडून त्याचे तुकडे करून मिक्सड व्हेजिटेबल पुलाव बनवत होता. पुलाव टेबलावर ठेवताच ह्या साऱ्या फळभाज्या पुन्हा सजीव होऊन भाताच्या प्लेटभोवती फेर धरून नाचत होत्या आणि कोपऱ्यात उभी असलेली हमिदे त्याच्याकडे पाहून पोट धरधरून हसत होती...

## तंत्रज्ञांची आयात

—पहाटे हॉटेल सोडलं. इस्फहान-शिराझचा पंधरा दिवसाचा दौरा. ड्रायव्हर हैदरी भलताच खुषीत दिसत होता. ऑफिसतर्फे सर्फराझ नावाचा तरुण इराणी अधिकारी बरोबर होता. सर्फराझचं कॉलेजनंतरचं शिक्षण अमेरिकेत झालेलं. बोलताना उगाचच तो अमेरिकन स्लॅग वापरायचा. इग्रजी उच्चार देखील नकली अमेरिकन. तोंडामध्ये सदैव किचकीच करून चावलं जाणारं चुईंगम्— मला ह्या प्रकाराची विलक्षण चीड. पण सर्फराझचं एकूण व्यक्तिमत्त्व इतक प्रसन्न होतं की त्यामुळं त्याच्या 'अमरिकी' सवयीचा विशेष त्रास जाणवला नाही. कुठल्याही वाक्याची सुरुवात तो 'मी जेव्हा अमेरिकेत होतो–' अशा प्रकारे करायचा. एरवी मला मस्तकशूळ झाला असता पण सर्फराझचा स्वभाव बुलंद...आपोआपच त्याच्या ह्या बारीकसारीक त्रासदायक लकबीकडे दुर्लक्ष व्हायचं.

गाडी तेहरानच्या बाहेर पडून हमरस्त्याला लागली आणि हैदरीनं ॲक्सलरेटर दाबला. शभर, एकशेदहा, एकशेपंचवीस— एकशेचाळीसवर स्पीडोमीटरचा काटा स्थिरावला. उत्कृष्ट दर्जाचा रस्ता, उत्कृष्ट दर्जाची गाडी. प्रवास वेगानंच होणार ! मी फ्रंटसीटवर बसलो होतो. सर्फराझ मागच्या सीटवर. तो सांगत होता—

'मी १९६९ साली अमेरिकेला मार्केटिंग आणि मॅनेजमेंटचा अभ्यास करायला गेलो. दोन वर्षं अमेरिकेत खूप गंमत केली. तिकडच्या पोरी एकदम फ्री– आमच्या इकडच्यासारख्या नाहीत. इराणी पोरी फक्त दिसायलाच मॉडर्न– नसतं अंगाला बोट लावलं तरी आई गऽऽ म्हणून किंचाळतील ! इतर गोष्टी सोडाच. अमेरिकेत डेटिंग म्हणजे मजा. इथं डेटिंग आहे...पण पोरगी एकटी येत नाही- बरोबर मैत्रिणीला घेऊन येते मग नुसतं पर्शियन कविता ऐकत रहायचं......पण एक आहे, आमची पर्शियन कविताच इतकी अप्रतिम आणि धुंद करणारी आहे की त्यापुढं अमेरिकन डेटिंग म्हणजे हलक्या प्रतीचा शृंगार–शृंगार कसला नुसतेच शारीरिक चाळे, पर्शियन पोरीची सर अमेरिकन पोरीला कधीच येणार नाही !'

विचार प्रगट करताना सर्फराझची धादल उडत होती हे स्पष्ट दिसत होतं. एकीकडे अमेरिकन अनुभव–दुसरीकडे पर्शियन परंपरा– इराणी अभिमान ! नकळत त्याच्या तोंडून परस्परविरोधी विधानं बाहेर पडत होती. मी त्याला विचारलं–

'सर्फराझ, तू अमेरिका सोडून इथं का आलास ? मी तर ऐकलंय अनेक इराणी एकदा अमेरिकेत गेले की तिथंच नोकरी मिळवून, एखाद्या अमरिकी पोरीबरोबर लग्न करून, ग्रीन कार्ड मिळवून स्थायिक होतात...आमच्या भारतामधील तरुणासारखे. तुला मिळाली नाही का एखादी पोरगी तिथं ?'

दिलखुलास हसत सर्फराझ म्हणाला–

'खरं सांगू माझं अमेरिकेत मन अजिबात रमलं नाही. ज्यांना तिकडची जिंदगी आवडते त्यांच्याबरोबर आपलं भांडण नाही. प्रत्येकाचा तो वैयक्तिक प्रश्न. मी रमलो नाही हे खरं. म्हणून मी आमच्या एवसीत नाव नोंदवलं...आमच्याकडे एक चांगली पद्धत आहे...पंतप्रधान अमीर अब्बास होवेदानं ही 'स्कीम' सुरू केली. इराणनं झपाट्यानं तांत्रिक प्रगती करून युरोपमधील राष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून उभं रहावं अशी शहनशाहची इच्छा आहे... आता हिंदुस्थानचंच उदाहरण घे. तुमच्याकडे गरिबी आहे. पण अमेरिका-जपानच्या तोडीचं तंत्रज्ञान पण आहे. तुम्ही कुणावर अवलंबून नाही. इराणमध्ये मात्र तंत्रज्ञाचा, शास्त्रज्ञाचा प्रचंड तुटवडा आहे. तर ही तूट भरून काढण्यासाठी अमीर अब्बास होवेदानं ही स्कीम काढली. ज्या कुठल्या परदेशी वास्तव्य करणाऱ्या इराणी माणसाला मायदेशी परत यावयाचं असेल त्यानं एवसीमध्ये नाव नोंदवायचं. आपल्याला कुठल्या क्षेत्रात काम करायचं आहे ते लिहायच. किती पगार अपेक्षित आहे ते देखील नमूद करायचं. सर्व एवसीजमध्ये अशा प्रकारची रजिस्टर्स ठेवली जातात. जेव्हा एखादं नवीन प्रॉजेक्ट आकार धरू लागतं तेव्हा त्यासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञ परदेशाहून बोलविण्याऐवजी मग ह्या रजिस्टर्समधून योग्य इराणी मिळतो का हे पाहिलं जातं. जर योग्य माणूस असेल तर पंतप्रधानाच्या ऑफिसकडून त्याला मानाचं बोलावणं येतं. मला १९७१ साली तसं पत्र आलं...मी तावडतोब आलो. अजून मला वर्षदेखील झालं नाही इथं येऊन......'

आम्ही भारतामध्ये 'ब्रेन ड्रेन' म्हणून बोंबलत असतो. परदेशी

जाऊन उच्च शिक्षण किंवा अनुभव घेऊन परतलेल्यांच्याकडे ढुंकूनही बघत नाही. त्याच्या उलट इराणमधील प्रकार, अर्थात हिंदुस्थानामध्ये विविध क्षेत्रातील तंत्रज्ञच इतके अमाप आहेत की, आहेत त्यानाच योग्य नोकऱ्या मिळणं कठीण. मग परदेशी डिग्रीवाल्याला कोण विचारणार! आम्ही खरं म्हणजे 'ब्रेन ड्रेन' बद्दल ओरड न करता 'ब्रेन एक्सपोर्ट करायला पाहिजे. सर्फराझला आणखी काही प्रश्न विचारावेत म्हणून मी मागं वळून पाहिलं तर स्वारी मागच्या सीटवर आरामात लवंडून घोरत होती. हैदरी मला सांगत होता 'तूही झोप काढ- रेस्ट्रॉरंट आलं की मी उठवतो-' मला चालत्या गाडीत झोप येत नाही. मी खिडकीबाहेर पाहू लागलो.

दहा-बारा वर्षं आग्नेय आशियामध्ये हिरव्यागार निसर्गाच्या सहवासात राहिलेल्या मला इराणचं हे उजाड वाळवंटी स्वरूप अतिशय भकास वाटत होतं. असल्या वैराण वाळवंटात खुरट वाढीच्या झुडपाशिवाय दुसरं उगवणार तरी काय? तसं पहाता उटांच्या तापयांनी पालथा घालण्यायोग्य प्रदेश. केवळ खनिज तेल आहे म्हणून हातात अमाप पैसा खेळतोय. उंटाची जागा इपोर्टेड गाडयानी घेतलीय आणि संथ वाटचालीला नको इतका जीवघेणा वेग प्राप्त झालाय केवळ पैशाच्या जोरावर आधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करून देऊन प्रगतीचा-विकासाचा-वेग खरोखरीच वाढवता येतो का? एखादी योजना सपूर्ण होऊन फलद्रूप होण्यास लागणारा काळ कमी करता येतो का? कुठलही बीज पेरल्यानंतर ते रुजून त्याला कोंब फुटायला एक विशिष्ट काळ आवश्यक असतो. त्यानंतर त्या कोंबातून वृक्ष वाढणार. त्याची पाळंमुळं जमिनीत खोलवर पसरणार. मग त्याला बहार येणार आणि शेवटी फळ; पण हे सर्व होण्यास एक ठराविक काळ नको का जायला?...आधुनिक शास्त्रानं हा काळ थोडा कमी करता येईल हे निश्चित; पण किती कमी? त्यालाही मर्यादा आहेच.

*गाडी भन्नाट पळत होती आणि माझं मन अनेक विचाराचा गुंता* सोडविण्याचा प्रयत्न करत होतं. बायको आणि मुली बँकॉक सोडून कोसबाडला वर्षासाठी रहावयास गेल्या होत्या. तिथं ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ १९४५ सालापासून वारली आदिवासीना आणि *त्याच्या मुलाबाळाना ग्राम बालशिक्षाकेंद्रामध्ये अतिशय हळुवारपणे* आधुनिक जगाची माहिती करून देत होत्या. पहिल्या पिढीला कदाचित काहीच समजलं नसेल. दुसऱ्या पिढीला थोडसं समजलं असेल. नवीन शिकताना आपल्या सस्कृतीला तर धक्का लागत नाही ना, अशी *आदिवासींना काळजी लागली असेल. त्या* काळजीपोटी नवीन काही शिकण्यास मन कचरत असेल. तिसऱ्या पिढीला मग पटल असेल... ताराबाई किंवा मनुताई आपली संस्कृती न दुखवता आपल्याला आधुनिक जगाबरोबर आणण्याचा प्रयत्न करत आहेत आणि तो प्रयत्न देखील कसा, तर बालवाडीपासून...मानीत मानीत न्यावे' ह्या सूत्रानुसार आणि इथं इराण तर एका पिढीतच प्रगतीचं शिखर गाठण्याची जिद्द बाळगून सुसाट सुटलेला!

आमची प्युजो स्टेशनवॅगन भरधाव रस्ता कापत होती. डाव्या हाताला दूरवर वाळवंटाच्या मध्यभागी, अगदी क्षितिजापर्यंत पसरलेलं चकचकीत पाढरं सरोवर दिसत होतं. मी डोळ्यावरचा काळा चष्मा काढून काच पुसली आणि पुन्हा त्या दिशेनं पाहिलं. पाणी निळं दिसायला हवं! पण त्या सरोवराचा रंग तर पांढरा!! मृगजळ तर नसेल! मी हैदरीला प्रश्न केला. त्यानं जबाब दिला—

'आगा-ए-विजे, उंजा ऑब बीस्त-नो वाटर ..फक्त् नमक दारे...ओनली सॉल्ट...अँड बीग बॅड ॲनिमल-सुस्मारे-व्हेरी डेंजर-'

इराणच्या दश्त-ए-कवीर ह्या भल्याथोरल्या वाळवंटी प्रदेशातील हा 'सॉल्ट डेझर्ट' चा भाग इतकं मला समजलं, पण महाभयंकर प्राणी सुस्मारे काही समजेना. हैदरी जेव्हा चेहऱ्याच्या वेगवेगळ्या हावभावानी आणि प्रसंगी चाकावरील दोन्ही हात सोडून 'सुस्मारे' समजावून देण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा मी घाईघाईनं 'समजलं-समजलं' असं म्हणत त्याला गप केला. सुस्मारे म्हणजे लॉकनेस् फॉन्स्टरसारखा काही तरी प्रकार असावा...सवडीनं माहिती मिळवता येईल म्हणून मी विषय बदलला. इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू केल्या.

दूरवर उजव्या हाताला एका टेकडीवजा उंचवट्यावर कारवानसराई टाइपची इमारत दिसत होती. इमारतीसमोर बऱ्याच बसेस, ट्रक्स आणि खाजगी गाड्याची गर्दी होती. हैदरीनं गाडी सफाईनं वळवून एका मोकळ्या जागी पार्क केली आणि 'चायखुने-इंजा सुबुने मी खुरिम्...ब्रेकफास्ट-वी ईट' म्हणत सर्फराझला जागं केलं.

रस्त्याकडेचं हे एक भलंमोठं इराणी हॉटेल होतं. सर्वत्र आरसे लावले होते. काउंटरच्या वर शहेनशहा आणि महाराणी फराह ह्याचे मोठे रंगीत फोटो. मधोमध हसऱ्या गोडस चेहऱ्याच्या शहजादे रेझाचा फोटो. इतर भिंतीवर महमंद पैगंबर करबला वगैरे धार्मिक चित्र. हॉटेलच्या दर्शनी भागावरील काचेवर मात्र वर्तमानपत्राचे कागद चिकटवले होते.

हॉटेलात खच्चून गर्दी होती. संगमरवरी गोल टेबलाभोवती गर्दी करून बसलेली इराणी मंडळी समोरच्या पदार्थावर आडवा हात मारून ब्रेकफास्ट उरकीत होती. आम्ही आत शिरलो तेव्हा पहिल्याच टेबलावरील पाच-सहा ट्रकड्रायव्हर्सनी 'आगा बेफर्माई' म्हणत आपल्या समोरील थाळ्यामधील नान आमच्या पुढ्यात धरला. मी नानचा तुकडा मोडून 'थँक्यू' म्हणत तोंडात टाकला तेव्हा सगळे गदगदून हसले. मी जरा गोंधळलो. सर्फराझला माझी अवस्था ध्यानात आली. मनमोकळं हसून पाठीवर थाप मारत तो म्हणाला,

'एव्हढं नाराज होण्याचं कारण नाही. अरे, हा एक इराणमधला रिवाज आहे. आपण खात असलो आणि एखादा प्रवासी दमूनभागून आलेला दिसला तर त्याला आपल्या थाळीतील अन्न पुढं करून आग्रह करण्याची पद्धत आहे...ह्याचा अर्थ प्रवाशानं लगेच त्यातील पदार्थ खायला सुरुवात करावी असा नाही; पण एखादा पदार्थ घेतला म्हणूनही काही बिघडत नाही. लोक हसले तुझ्या 'थँक्यू' ला! नानचा तुकडा घेतलास म्हणून नाही.'

सर्फराझनं समजूत काढायचा प्रयत्न केला तरी आतून मी थोडा खजील झालो होतो हे सत्य. एक टेबल रिकामं होताच हैदरीनं त्याचा ताबा घेतला. आम्ही झटपट खुर्च्या अडवल्या. *नाश्ता काय* मागवायचा ह्याबद्दल सर्फराझ आणि हैदरीमध्ये बरीच उत्साही चर्चा झाली. मेनू ठरला आणि वेटरला ऑर्डर देण्यात आली. टेबला-

वर अगोदरच्या मंडळीच्या ब्रेकफास्टचे तुकडे विखुरले होते. फडकेवाला पोऱ्या कधी येऊन टेबल साफ करतोय ह्याची मी वाट पाहू लागलो. त्याच्याऐवजी वेटरच आला. आडव्या हातावर टॉवेलच्या घड्या टाकाव्या त्याप्रमाणे सात-आठ नान होते. त्यापैकीच एका नाननं त्यानं टेबल झटकलं आणि बैलांसमोर कडबा टाकावा त्याप्रमाणे उरलेले नान आमच्यासमोर टाकले. एकएक नान फूटभर रुंद आणि अडीच तीन फूट लांब ! नानच्या पाठोपाठ त्यानं टेबलाच्या मध्यावर डझनभर उकडलेली अंडी ठेवली. प्रत्येकाला लोण्याची मोठी वडी, तितकीच मोठी चीझ् (पनीर) ची वडी आणि मधाची वाटी. त्याचबरोबर कसला तरी फिकट हिरवा दाट द्रव असलेले तीन छोटे पेले त्यानं ठेवले. हैदरी आणि सर्फराझनं पेला उचलून तो अर्धा औंस द्रव एका घोटात संपवला. मी देखील (मूर्खाप्रमाणे) त्याचं अनुकरण केलं.

द्रव घशात ओतला आणि नखशिखात झिणझिणलो ! केसन्‌केस ताठ उभा राहिला. मणक्याचे तुकडेतुकडे करणारी शिरशिरी माकडहाडापासून थेट मेंदूत शिरली. दातखिळीच बसली ! तो द्रव म्हणजे लिंबाचा आबटढाण रस होता ! अर्धा औंस लिंबाचा आंबट आबट शुद्ध रस. सणसणणारे दात हिरड्यातून सुटून पडणार असं वाटलं. दात इतके प्रचंड आंबले की नानचा तुकडा चावणं देखील अशक्य झालं. मी चहाचा अर्क पीत आंबट तोंडानं बसून राहिलो. हैदरी आग्रह करू लागला तेव्हा त्याला सांगितलं. 'माझी एकादशी आहे!' आणि खवचट प्रश्न विचारला, 'हैदरी, तुझ्या रमझानचं काय झालं ? कालपासून तू रोझे धरले होतेस ना ?' उकडलेलं एक अंड आख्खंच्या आख्खं तोंडात टाकत हैदरी प्रसन्न चेहऱ्यानं म्हणाला,

'आगा–ए.विजे, मुसाफिरातमधे सफरमधे रोझे मोडले तरी चालतात !'

आणि पुन्हा एकाग्र चित्तानं त्यानं नान, पनीर, लोणी, मध, अंडी ह्यावर ताव मारण्यास सुरुवात केली. मधूनमधून माझ्याकडे पाहून तो नुसतीच सहानुभूतिदर्शक मान हलवीत होता. जणू त्याला म्हणायचं असावं. 'प्रवासात एकादशी आणि उपवास करायला सांगणारा हा कसला चमत्कारिक धर्म !'

दातांच्या झिणझिण्या जरा कमी झाल्या आणि माझ्या डोक्यात स्वच्छ उजेड पडला. दौरा कधी सुरू होणार ह्याबद्दल हैदरी वारंवार का चौकशी करत होता ह्याचं उत्तर मिळालं. हैदरीला बहुतेक माझा विचार समजला असावा. माझ्याकडे पाहून मिस्किलपणे हसत काहीसं लाजत तो नान आणि अंड्याचे बकाणे भरत राहिला. मी काहीच खात नाही आणि आपण दोघेच खात आहोत हे बऱ्याच वेळानं लक्षात आल्यावर सर्फराझला काहीसं 'ऑकवर्ड' वाटल्यासारखं दिसलं. चहाचा पाचवा कप रिचवत तो म्हणाला,

'इराण इस्लामिक देश आहे, हे तुला माहीतच आहे. आम्ही सगळे शिया मुसलमान आहोत. रमझानच्या वेळी बहुसंख्य लोक रोझे पाळतात त्या काळात सार्वजनिक ठिकाणी उघडपणे काही खाण्यापिण्यास कायद्यानं बंदी आहे म्हणून तर हॉटेलच्या सगळ्या काचेच्या खिडक्यांना कागद लावले आहेत. बाहेरून आतील काही दिसत नाही. बाहेरील धार्मिक लोकांच्या भावना दुखवल्या जात नाहीत. पडद्याआड, खाजगीत खाल्लं तर चालतं आणि आपण तर प्रवासात आहोत !'

मी प्रश्न विचारण्याचा प्रयत्नच केला नाही. प्रश्नाला उत्तर मिळालं असतं तरी ते समजणं माझ्या आवाक्याच्या बाहेरचं होतं. मनात मात्र मी म्हटलं 'बोक्यांनो, तुम्ही डोळे मिटून दूध पिताय पण खुदा वरून सगळं पहातोय. काचेच्या खिडक्यांना कागद चिकटवून त्याला तुम्ही फसवू शकणार नाही. मनातल्या मनात डाफरून त्यांना खुदाचा धाक दाखवीत असताना मला खरी हळहळ मात्र वाटत होती ती त्यांच्याप्रमाणे समोरच्या ताज्या नान आणि लोण्यावर आडवा हात मारता येत नाही याची. माझी अवस्था आपलेच दात आणि आपले ओठ आणि दोन्ही आंबलेले अशी झाली होती.

दोघांनी यथेच्च ब्रेकफास्ट संपवला. चहाच्या कपातील शेवटचा घोट घेण्याअगोदर सर्फराझनं खिशातून औषधाची एक छोटीशी बाटली काढली. तळहातावरची गोळी तोंडात टाकली. मी प्रश्न केला 'व्हेलियम् ?'

चहाच्या घोटाबरोबर गोळी गिळत सर्फराझ म्हणाला– 'होय, व्हेलियम– महिन्यापूर्वी मी जबरदस्त मानसिक तणावाखाली होतो तेव्हा डॉक्टरनं मला हे औषध घ्यायला सांगितलंय. दिवसातून चार वेळा. इराण मॉडर्न होतंय– जिंदगी मुष्किल झालीय—मग टेन्शन येणारच–' बोलता बोलता तो थांबला. काही काळ शून्यात बघत हरवल्यासारखा बसून राहिला. हैदरी काडीनं दात कोरत उगाचच गंभीर चेहऱ्यानं इकडे तिकडे पाहू लागला आणि बिल् देऊन आम्ही उठलो.

( क्रमशः )

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. घ. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# पुस्तके

# स्वर : मनमोहक कथा

सौ. कल्याणी हर्डीकर

'काही काही रागदारीत काही काही स्वर वर्ज्यच असतात. वर्ज्य झालेला स्वर वाईट असतो म्हणून वगळायचा नसतो, तर एक राग उभा करायचा असतो. त्यासाठी आपण तो खुषीनं विसरायचा असतो. वाद्यातल्या तेवढ्या पट्ट्या उपटून फेकायच्या नसतात, त्यांना फक्त चुकवायचं असतं ...' 'स्वर' या कथासंग्रहातील वपुंचे हे 'ठुमरी'तले तत्त्वज्ञान म्हणजे काळ्यांचं वैशिष्टच आहे. काळ्यांची कुठलीही कथा वाचताना प्रत्यक्ष वपु डोळ्यांसमोर उभे राहतात, हेच त्यांच्या कथेचं वैशिष्टच आणि उणीवही.

लघुकथा वाचनीय असते तितकीच ती श्रवणीय असते. किंबहुना कथाकथनामुळे ती अधिक प्रभावी ठरते हे वपुंच्या असंख्य कथाकथनाच्या कार्यक्रमांनी सिद्ध झालेले आहे. रविकिरण मंडळाने कविता जशी गायनाने समाजमानसात पोचवली, तशीच लघुकथा, ग्रामीण कथा, व्यंकटेश माडगुळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांनी कथाकथनाद्वारे समाजाच्या सर्व स्तरात पोचवली. यांच्याप्रमाणेच वपुंचाही वाटा त्यात मोठा आहे. वपु हे जितके उत्तम कथालेखक आहेत तितकेच ते उत्तम कथाकथनकारही आहेत.

कथाकथन ही आज एक स्वयंपूर्ण कला बनली आहे. कथाकथनात नाट्याभिनिवेष येतो; पण तो एकपात्री प्रयोगाप्रमाणे संपूर्ण नाट्यात्मक नसतो. कथा सांगणारा तो आपलं अस्तित्व वेगळं ठेवून, अलिप्तपणानं काही विशिष्ट लकबींनी, आवाजातल्या बदलाने, आविर्भावाने कथा निवेदन करतो. कथेत वाहवत न जाता कथानुभव व्यक्त करणे अवघड आहे. या कथाकथनाच्या कलेत काळ्यांचे स्थान प्रमुख आहे.

काळ्यांची जनमानसातली प्रतिमा ही कथाकथनकार वपुंची आहे आणि त्याचाच परिणाम त्यांच्या कथालेखनावर झालेला आहे, याचा प्रत्यय त्यांच्या बहुसंख्य कथांतून येतो. 'ठुमरी' कथेतलं वाक्य एवढ्यासाठीच उद्धृत केलं होतं की, अशासारखी वाक्ये वाचताच काळे डोळ्यांसमोर उभे राहतात ती कथा वाचत असतानाच ती वपु सांगतायत असा ऐकण्याचा अनुभवही मिळतो हे त्यांच्या कथांचे वैशिष्टच.

वपुंच्या पुष्कळ कथा सांगितलेल्याच असतात. आपण त्या ऐकत असतो. त्यांच्या बहुतेक कथांतून 'मी' असतो. ही लकब नाही, तर गरज आहे असे वाटते म्हणूनच 'मला समजलंय' सारख्या कथेमध्ये सुरुवातीला अरबी गोष्टीचे वातावरण निर्माण करून मग कथेतील एका पात्राची भूमिका घेऊन 'मी'ची सोय केल्यासारखी जाणवते, अतिशय करुण अशा कथेची ही अरबीमय सुरुवात खटकते, कदाचित अनेक कथांमधून येणारा आणि काही वेळा मोनोटोनस वाटणारा 'मी' टाळायचा प्रयत्न वपुंनी इथं केला असावा; पण तो तितकासा रोचक वाटत नाही.

वपुंच्या या 'मी'ला सारखी श्रोत्यांची जाणीव आहे. या श्रोत्यांचे रंजन करावयाचे आहे. शेवटपर्यंत त्यांचे लक्ष, भान क्षणमात्र हलू द्यायचे नाही. या जबाबदाऱ्यांची जाणीव ह्या 'मी'ला आहे म्हणूनच अनेक कथांचे आरंभ मूळ कथानुभवाला दूरान्वये स्पर्श करणारे आहेत. उदा. 'कर्मचारी जठार' कथेतला अरब आणि उंटाचा उल्लेख केवळ उत्सुकता वाढवण्यासाठी आहे असे वाटते. 'मी, माझी पत्नी आणि तिचा प्रियकर,' 'मोले घातले बोलाया' या कथांचे आरंभ असेच श्रोत्यांशी गप्पा मारून, त्यांचे कुतूहल वाढवणारे आहेत.

ज्या कथांमध्ये हा मी नसतो तिथेही वपु श्रोत्याचे अस्तित्व विसरलेले नसतातच. उदा० 'वसा वसाचा वसा,'– तिचे कहाणीरूप त्यासाठीच आहे. हे कहाणीरूप वजा केले तर त्या कथेत काहीच उरत नाही. कथेत अरबी गोष्टींच्या वातावरणाची निर्मिती करणे किंवा कहाणीवजा निवेदन करणे या गोष्टीवरून निश्चितपणाने वाटते की, हे असले प्रयोग वपु. आपली कथा एकाच साच्याची होऊ नये म्हणूनच करत असावेत. आपल्या कथेचा एक साचा होतो आहे याची जाणीव त्यांना होत असावी.

वपुंच्या कथेत नित्यानं येणाऱ्या ह्या 'मी'चे आणखी एक वैशिष्टच जाणवते ते असे की, हा 'मी' वपुंइतकाच चलाख, बहुश्रुत, हजरजबाबी, मिस्किल काही काही वेळा हळवा–भाबडा आहे. हा 'मी' म्हणजेच स्वतः वपु. प्रत्येक कथेत वावरणारा, कथा व्यापून उरणारा आणि म्हणून मग काही वेळी प्रत्येक कथा ही फक्त वपुंच्या भावविश्वाची, वपुंच्या अनुभवतुकड्यांचीच कथा वाटू लागते. 'ठुमरी'तला सुनील, 'स्वर'मधला नाना, 'पहिली खेप'मधला मी, 'किक'मधला पपा, 'धर्म'मधला नवरा, 'एका मिठीची कथा'मधला नायक, हे त्या त्या कथांचे नायक वाटत नाहीत. त्या नायकांना स्वतःचे असे वेगळे अस्तित्व नाही. त्या सगळ्यांचेच चेहरेमोहरे सारखे आहेत, ते थोड्याफार फरकाने एकाच प्रकारची चुटचुटीत, मिस्किल, कधी सुभाषितवजा वाटणारी, हळुवार होऊन तत्त्वज्ञान सांगणारी वाक्ये बोलतात.

श्रोत्यांशी संवाद साधताना ह्या 'मी'ला तर खटकेबाज, चलाख, खुसखुशीत, संवाद, कोट्या यांचा आधार घ्यावाच लागतो आणि तो घेतानाच काही काही वेळा 'मी'ची चलाखी दुसऱ्या पात्रांवर देखील परावर्तित केली जाते. उदा. 'पहिली खेप'मधले घाटे

रंगात येऊन घरातील विविध 'सँडविच' प्रकारांचे जे वर्णन करतात, ते घाटघांच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत वाटत नाही किंवा 'दुर्वास'मधला 'मी' ह्रा जेव्हा रजनीच्या व बायकोच्या गप्पा ऐकत असताना मुलाखतीबद्दल जे जे भाष्य करतो ते ते कथेशी सुसंगत वाटत नाही. गोष्ट सांगता सांगता वपुंना नेहमीच चलाख गप्पा मारण्याचा मोह आवरत नाही. त्यांचा हा मोह चांगल्या कथेची एकसंधता बिघडवतो, कथानुभवाला बाध आणतो.

प्रत्येक लेखकालाच कोणत्या ना कोणत्या गोष्टीचे मनस्वी आकर्षण असते. वपुंना जिद्दी, ताठ मानेनं जगणाऱ्या, न मोडणाऱ्या माणसाचे आहे. त्यांच्या किती तरी कथांमधून ही माणसे अगदी जिवत स्वरूपात आपल्याला ते भेटवतात.'ठुमरी'तला सुनील संसारसुखाला वंचित होऊनही शेवटपर्यंत ताठ आहे. अपत्यहीनतेचे दुःख अनेक प्रकारची सततिप्रतिबंधक साधने जवळ बाळगून आतल्या आत पचवणारा नार्वेकर (कर्मचारी-जठार) असाच ताठ आहे. 'मला समजलंय' मधील आठदहा वर्षांची एवढीशी शर्मिलाही कणखर आहे. डर्बीचं तिकिट काढण्यासाठी स्वतःच्या बायकोच्या गळ्यातले मंगळसूत्र विकून पैसे उभे करणारे 'जिद्द'मधले दादा असाच न मोडणाऱ्या माणसाचा नमुना आहेत. अशी जिद्दी ताठ माणसे वपुंच्या पुष्कळ कथामधून वावरतात.

वपुंच्या बऱ्याच कथा प्रणयविश्वाचे चित्रण करणाऱ्याही आहेत; पण हा प्रणय संयत आहे. बेबंद नाही, वाममार्गीही नाही. प्रणयाकडे बघण्याचीही वपुंची अशी खास दृष्टी आहे आणि तो रंगवण्याचीही त्यांची खास शैली आहे. ते उन्मादक, उत्तान लिहीत नाहीत. काहीसे मिस्किल होऊन ते प्रणयाकडे बघतात. प्रसन्न निर्मळ शैलीने तो रंगवतात म्हणून ती शृंगारकथा उठवळ बाजारी न होता प्रसन्न रुचिर होते. 'एका मिठीची कथा' ही कथा तर खरी घरोघरचा अनुभव व्यक्त करणारी आहे.

वपुंच्या प्रणयकथातले नायक-नायिका हे परंपरागत नीतिमूल्ये सांभाळणारी आहेत. जीवनाकडे आणि विशेषतः लैंगिक जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन विकृत नाही. त्यांच्या कथातून लंपट, विकृत, हिडिस असा लैंगिक जीवनाचे चित्र येत नाही.

हल्ली साहित्यक्षेत्रात अशी पद्धत आहे की, लैंगिक जीवनातल्या अनेक समस्यांचे, विकृतीचे न समजणाऱ्या प्रतिमांच्या भाषेत वर्णन केले, बीभत्स भावनाना कथारूप दिले. शृंगारिक-लैंगिक जीवनाचे 'धीट, उघडे.' दर्शन कथांतून घडवले की ती कथा पुरोगामी, श्रेष्ठ कथा ठरते. कारण जीवनाचे वास्तव चित्रण त्यातून घडवलेले असते. अनुभवाचा तळ त्यात गाठलेला असतो म्हणून ती श्रेष्ठ कथा.

हेच मूल्य लावून वपुंची कथा बघितली तर ती श्रेष्ठ नाही. कारण धीट उघड दर्शन घडवणे हीच जर अनुभवाची सखोलता असेल तर असले विकृत सखोल अनुभव वपुंनी तळ गाठून अनुभवलेले नाहीत. तो त्यांचा पिंड नाही. वपुंची जीवनाकडे बघण्याची निर्मळ दृष्टीच त्यांच्या सर्व कथातून अनुभवायला मिळते आणि दिवसेंदिवस बाजारू होणाऱ्या कथांमध्ये वपुंच्या कथाचे वैशिष्ट्य जर कुठे असेल तर ते हेच. ह्या कथा तुमच्या माझ्या जीवनातल्या आहेत. इथल्या मातीतल्या आहेत...इथल्या माणसाच्या सुखदुःखाच्या आहेत.

इथल्या म्हणताना शब्द जपून वापरायला हवा. इथल्या म्हणजे पांढरपेशा मध्यमवर्गाच्या जीवनाच्या कथा आहेत.

पांढरपेशा मध्यमवर्गाची ही कथा श्रेष्ठ कथाच होऊ शकत नाही हा आणखी एक समज साहित्यक्षेत्रात आहे. दलित किंवा ग्रामीण जीवनाचे चित्रण जर कथेत असेल तर ती अस्सल कथा, पांढरपेशा समाज हा कथा रंगवायला बेकार. बरं जर कोणी रंगवलच ह्या समाजाचं चित्रण तर ते वरवरचं. अनुभवाचा तळ न गाठणारं, परिघातलंच. शेवटी मूल्यमापन करताना प्रत्येक वेळी हेही लक्षात ठेवायला हवं की style is the man. आपल्यातल्याच एका थोर साहित्यिकाने म्हटले आहे की, माणूस वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत जे जे अनुभवतो ते ते त्याच्या साहित्यातून प्रकट होते. काही जण आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून कथालेखन करतात.

'स्वर' च्या प्रस्तावनेत ल. ग. जोगही वपुंच्या बाबतीत हेच म्हणतात की, 'काळोंना जे जीवन अनुभवायला मिळाले, त्या अनुभवविश्वाशी काळे अंतर्बाह्य प्रामाणिक राहिले'. मागणी तसा पुरवठा काळेंना करता आला असता. वपु तालुकापातळीपर्यंत कथाकार काळे म्हणून नटाप्रमाणे पोचले आहेत. ग्रामीण शब्दांची खोटी आतषबाजी करून ते या तालुकापातळीवर ग्रामीण लेखक म्हणूनही नावारूपाला आले असते; पण वपुंनी तसे केले नाही. या ल. ग. जोगांच्या मताशी सहमत व्हावेसे वाटते.

'स्वर' मध्येच चटकदार कथा रंगवता रंगवता काळे अंतर्मुख होताना दिसतात ते जठारचे व्यक्तिचित्र रंगवताना. वपुंच्या प्रतिभेत इतर मराठी लेखकात अभावाने आढळणारा एक गुण आहे, तो कल्पनारम्यतेचा. वास्तवात चक्क अद्भुताचे मिश्रण करून ते कथानिर्मिती करतात. कथा फॅंटसीच्या पातळीवर नेतात. 'वाघच पण मि. वाघ नव्हे' ही कथा त्याचे उत्तम उदाहरण. 'हातमोजा' ही ह्या संग्रहातील दुसरी अद्भुत कथा. अतितरल कल्पनाशक्ती हा फॅंटसीचा पाया असतो, अशी कल्पनाशक्ती काळेंना लाभलेली आहे. ह्या संग्रहात नसलेली पण अशीच उत्तम फॅंटसी असलेली 'नारदा, अवतार घ्यायलाच हवा!' ही कथा.

मराठीत अंतर्मनाचे दर्शन घडवणाऱ्या, गूढात्म प्रत्यय देऊ पाहणाऱ्या, जीवनातल्या गंभीर समस्यांचे दर्शन घडवणाऱ्या अनेक कथा वाचायला मिळतात; पण वपुंसारख्या मुक्त प्रफुल्ल कथा विरळा. वपुंचे वैशिष्ट्य आणि वेगळेपणा हेच आहे की त्यांच्या कथेत उणीवा असल्या तरी ती कथा हिरवीगार आहे. मोहक आहे. मनरंजनी असूनही चिंतनीय आहे.

वपु कथाकार आहेत, कथालेखकही आहेत. 'स्वर' वाचताना वपुंच्या ह्या दोन्ही भूमिका डोळ्यासमोर ठेवून वाचन केले तरी काही काही वेळा असे जाणवते की कथाकार वपु. कथालेखक वपु. वर मात करतायत. असं जर होत राहिल तर कथानुभव व्यक्त करण्याच्या पद्धतीवर निश्चितच मर्यादा पडतील. कथाकार वपुंना संवादावर कथा तोलण्याचा विलक्षण मोह होतो. 'संवादिनी' या संग्रहात त्यांच्या एकांकिकारूप कथा आहेत. 'स्वर' मधली 'एका मिठीची कथा' याच प्रकारातील किंवा 'ठुमरी'तला अर्धाअधिक भाग संवादानंच तोलला आहे. ह्या संवादाच्या नादात 'ठुमरी'त सुनीलच्या तोंडचे वाक्य कोणते

आणि अनुराधेच्या तोडचे कोणते ह्याची वपुची थोडीफार गल्लत होते.

कथाकथनाला ही संवादिनी शैली योग्य आहे. कारण नुसते निवेदन तिथे तेवढे आकर्षक ठरत नाही. संवादाचा फॉर्म तिथे आवश्यक वाटतो. ( आवाज बदलून नाटयाभास करता येतो.) पण कथेत मात्र संवादाचे हे बंधन स्वीकारणे आवश्यक आहे का ? याचा मात्र विचार करणे आवश्यक ठरेल.

'स्वर'च्या बाहेरच्या अगदी अलीकडच्या दिवाळी अंकातल्या वपुच्या 'खुर्चा' किंवा 'चिमणीचा मोती' ह्या असल्या कथा अगदी वेगळ्या आहेत.विचार करण्यासारख्या आहेत.

मध्यमवर्गीय पांढरपेशाचे विविध पैलूचे जीवन 'स्वर' मध्ये समृध्दपणाने चित्रित करण्यात वपु निश्चितपणाने यशस्वी झाले आहेत यात शंका नाही. ल. ग. जोगांची निवडही मार्मिक आहे ती वपुच्या विविध आशयाच्या विविध प्रतिभेच्या झलकी 'स्वर' मध्ये दाखवते. केव्हाही मनाची एकतानता करणारा हा 'स्वर' वाचनीय निश्चितच ! ¤

स्वर
वपु काळे
राजा प्रकाशन
पृष्ठे २१४ ( डेमी )
मूल्य २५ रुपये.

---

## २२ जून १८९७ – एका स्वातंत्र्यपर्वाचे अनैतिहासिक चित्रण : पृष्ठ ८ वरून

कै. आहिताग्नि राजवाडे याच्या आत्मचरित्रात रँड पुढच्या गाडीत का मागच्या याचा बरोबर अंदाज नसल्याकारणाने रँड जिवंत राहून चूक न व्हावी याकरिता ले. आयर्स्टचा बळी पडला, असं म्हटलं आहे; पण स्वत: दामोदर चापेकर व लोकमान्य टिळक यानी दिलेली हकीकत पाहता रँडच्या मागच्या बग्गीतील माणसाने (ले. आयर्स्ट) दामोदरला रँडच्या बग्गीवर चढलेलं पाहिलं आहे व तो काही तरी कुजबुजत आहे हे बाळकृष्ण चापेकराच्या लक्षात आल्याने त्यानी हेतुत: ले. आयर्स्टच्या बग्गीवर चढून गोळ्या झाडल्या हे स्पष्ट होतं.

### चापेकर कुटुंबातील वातावरण

चापेकरांवरील '२२ जून १८९७' या चित्रपटात त्याच्या कुटुंबाचंही चित्रण केलेलं आहे. सबंध चित्रपट पाहताना असं सारखं वाटतं की तिघे चापेकरबंधू एका बाजूला आणि उरलेलं त्यांचं कुटुंब दुसऱ्या बाजूला अशी त्या घरात सरळसरळ दुहीच पडलेली आहे. चापेकराच्या डोक्यात काही तरी सर्वसामान्यापेक्षा निराळे विचार घोळत आहेत याचा अंदाज घरातल्या मंडळीना असूनही आपल्या कुटुबाचं जे वर्णन दामोदर चापेकरानी आत्मवृत्तात केलं आहे ते नोद घेण्यासारखे आहे–

'माझ्या वडिलाना कीर्तनाच्या धंद्यात चांगला पैसा मिळे. माझे वडील खर्चिक असत. तेणेकरून ते नेहमी आला सणवार आनंदाने घालवित. पाहुणे परगावचे आले तर त्यांचा पाहुणचार ठेवण्यास माझे वडील मोठे उल्हसित असत. तेणेकरून आमच्या घरी कधी इष्टमित्र जमून मिष्ट पदार्थ भोजनास झाला नाही असे क्वचितच घडत असेल. परमेश्वर कृपेने आमचा संसारही उत्तरोत्तर वृद्धिंगत होत चालला असल्यामुळे आमचा आनंदही त्याबरोबर वाढत्या प्रमाणावर असे. त्यात विशिष्ट गोष्ट ही की, ससारात सुख उत्पन्न होण्याचे साधन जे प्रेम ते आमचे घरी पूर्ण तऱ्हेने होते. मी पुष्कळ घरात पाहतो पण ज्या घरात तंटा नाही असे निर्मळ घर मला दिसत नाही. आग लावा त्याच्या बाकीच्या सुखाला.पैसेवाले असतात कुटुंबही मोठे असते,पण एकाचे तोड पूर्वेकडे तर दुसऱ्याचे उत्तरेकडे. असा प्रकार आमच्या घरी नव्हता. मजपेक्षा जितके लहान तितके माझ्या आज्ञेत असत. माझी अमर्यादा कधीही त्यानी केली नाही. याबद्दल मी त्यांचा कसा उतराई होऊ ? परमेश्वर त्याचे कल्याण करो. असे प्रेमाने वागणारे माझे बहीण–भाऊ, माता पितर सुत – कलम यांनी घर कसे भरलेले होते. पण पूर्वजन्माप्रमाणे आम्हाला हा तिसराच नाद लागला असल्यामुळे या एकंदर संसारातून आमचे चित्त तिसरीचकडे.'

अर्थात एकांगीपणा हा सबंध चित्रपटाचाच विशेष गुण असल्यामुळे चापेकराच्या कुटुबाच्या चित्रणातही तो न येता तरच नवल! अशाच तऱ्हेचं एकागी चित्रण द्रविडबंधूच्या व्यक्तिमत्त्वांच्या–बाबतीतही करून चित्रपटकर्त्यांनी त्याच्यावर घोर अन्याय केला आहे. चित्रपट पाहून असं वाटत की चापेकर फासावर जाण्यास द्रविड बंधूच सर्वथैव कारणीभूत झाले. त्यामुळे एकीकडे रँडसाहेबाबद्दल सहानुभूती निर्माण होत असतानाच द्रविडबंधू हेच चित्रपटाचा खलनायक वाटायला लागतात व त्यांच्याबद्दल मनात चीड निर्माण होते. पण इतर व्यक्ती व घटनाच्या चित्रणाप्रमाणेच याही व्यक्तिमत्त्वाच्याबाबतीत चित्रपटातील रूप व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये फार मोठं अंतर आहे. द्रवीडबंधूच खरं स्वरूप कै. आहिताग्नि राजवाडे यांनी त्याच्या आत्मवृत्तात चागल्या तऱ्हेने उलगडून दाखवल आहे.

### द्रविडबंधू

अफरातफरीच्या प्रकरणात शिक्षा झाल्यानंतर तुरुंगात पाय ठेवत असतानाच निळूचा मोठा भाऊ गणू याने ब्रुइनला बजावलं होतं की 'मी लौकरच तुमच्या नाकावर पाय देऊन सुटून येईन!' आणि ते त्यानं खरंही करून दाखवलं; पण पुढे त्याना पुन्हा पकडून खटला भरण्यात आला. तो त्यानो स्वत.चा स्वत:च चालवला. त्यात त्याना पूर्वीच्या शिक्षेला धरून अधिक शिक्षा झाली. या त्यांच्या शिक्षेवर मराठा वर्तमानपत्रात स्वत: टिळकांनी एक सहानुभूतीपर लेख लिहिला व त्यात त्याच्या धडाडीची व चातुर्याची स्तुती करून सरकारने अशा गुणी माणसाकडून लष्करी हेरगिरीची कामे करवून घ्यावी, त्याना तुरुंगात डांबून ठेवू नये असे मत प्रदर्शित केले.

द्रविडबधू तुरुंगात ही शिक्षा भोगत असताना बाहेरच्या जगात काय चाललं आहे याचं त्याना अजिबात ज्ञान नव्हतं. रँडच्या खुनाचं नाटच घडून दोन महिने उलटून गेले तरीही काहीच हाती

लागेना. तेव्हा ब्रुइन या चलाख इंग्रज अधिकाऱ्याला द्रविडबंधूंची आठवण झाली. तुरुंगात द्रविडबंधूंची ब्रुइनशी जी चर्चा झाली त्यामध्ये त्याना असं लक्षात आलं की ब्रुइनचा संशय टिळक व नातुबंधू याच्यावर आहे. दोघंही द्रविडबंधू टिळकाचे परमभक्त होते. त्यानी आरंभीच *ब्रुइनला सागितलं की, हे लोक असी कृत्यं करणार नाहीत.* त्याच्या बाबतीत तू उगीचच पाण्यावर काठ्या मारत बसलास. त्यात तुझ्या हाती काही लभ्यांश लागणार नाही. तू पुण्यातल्या कोण-कोणत्या तालमी व आखाडे तपासलेस व कोणकोणाच्या झडत्या घेतल्यास ते सांग. त्यावर ब्रुइनने आपल्या सर्व तपासणीची यादी द्रविडबधूपुढे टाकली. त्यामध्ये गणूला चापेकराच्या आखाड्याचं नाव दिसल नाही आणि त्या आखाड्यामध्ये त्याचा धाकटा भाऊ निळू जात असल्याकारणाने तो त्याला माहीत होता. त्यामुळे त्याने हे नाव केवळ अनुमानधपक्याने सुचवल, त्याला त्याबद्दल काही विशेष माहिती होती म्हणून नव्हे. कदाचित ते जर अगोदरच यादीत असतं तर त्यासंबंधी काही बोलण्याचा प्रसंगही आला नसता.

अर्थात ब्रुइनसारख्या डोकेबाज अधिकाऱ्याला एकदा धागा सापड-ल्याबरोबर त्याने तो घट्ट पकडला आणि दामोदर चापेकरांवर विविध प्रकारे छाप पाडून (याची वर्णनं चापेकरांच्या आत्मवृत्तातही आहेत), त्याच्यातल्या पौरुषाला आवाहन करून चापेकरांकडून कबुलीजबाब घेतला. तेव्हा चापेकर पकडले गेल्याबद्दल खरा दोष जर कोणाला द्यायचा असेल तर तो दामोदरच्या कबुलीजबाबाकडेच जातो, असं कै. राजवाडे यानी आत्मवृत्तात म्हटलं आहे. त्यांनी पुढ असंही नमूद केलं आहे की, मी जेव्हा टिळक कैदेतून सुटून आल्या-नंतर काही दिवसानी *सिंहगडावर त्याना भेटायला गेलो तेव्हा* टिळ-काच्या बोलण्यातही हेच मत मला दिसून आलं. चापेकराच्या आखाड्याचे नाव सागताना पुढं चापेकर कबुलीजबाब देतील आणि मग आपण त्या सर्व दोषाला कारणीभूत होऊ याची द्रविडबंधूना अगोदर कसलीच कल्पना येणे शक्य नव्हते. म्हणूनच पुढं एकदा तो त्याच्यातील सहज एकापाशी बोलताना म्हणाला की, मला जर अगोदर चापेकरासंबंधी लोक इतके खवळतील असे वाटले असते तर मी त्यांचे नाव टाळले असते.

कै. राजवाडे यांनी तर असं स्वच्छ म्हटलं आहे की, दामोदर काहीच थाग लागू देत नाही असं पाहून आता त्याला सोडून देण्याची वेळ आली असता ब्रुइनने एक शेवटचा डाव टाकून पाहिला आणि तो कल्पनेच्या पलीकडे यशस्वी झाला...त्या कपटपटू मायावी राक्षसाने (ब्रुइनने) त्या भोळ्या ब्राह्मणाची (दामोदर चापेकरांची) अपरंपार स्तुती केल्याने तो *आपल्या जातीवर* जाऊन पार विरघळून गेला. इतका वेळ दडाला व कशालाही न जुमानता जो ताठ होता तो एकदम भावनावश होऊन मृदू पडला. त्याच्या डोळ्यातून घळघळ अश्रुधारा वाहू लागल्या आणि त्याने तात्काळ मी आणि माझा भाऊ या दोघानी मिळून हे खून केले असा कबुलीजबाब देऊन टाकला !

अर्थात कै. राजवाड्यानी हेही स्पष्ट केले आहे की, ज्या दिवशी सायंकाळी आम्ही रँडचा मृत्यू ऐकला त्या वेळी निळू द्रविडाने बाजारातून पेढे विकत आणले व द्रविडांच्या देवळात बसून आम्ही ते खाल्ले; पण तोच निळू व त्याचे दोघे थोरले बंधू आता चापेकरा-विरुद्ध उठले. मूळचे हे जरी इतके राजनिष्ठ व स्वजनद्रोही नसले तरी एकदा कर्दमात उतरल्यावर ते अधिकाधिक खोल जाऊ लागले यात संशय नाही.

तेव्हा इतिहासातील एखादं कलंकित पात्र स्वच्छ करून दाख-वण्याचा इथं प्रयत्न नाही, उलट वाजवीपेक्षा अधिक डागळलेल्या पात्राचं खरं व योग्य स्वरूप दाखवण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

## 'आधुनिक' शेवट

शेवटी चित्रपटाच्या शेवटाविषयी थोडंसं. चापेकरबंधू व महादेव रानडे हे क्रांतिवीर फाशी जात असल्याचे प्रसंग अत्यंत रटाळ पद्ध-तीने दाखवल्यावर चित्रपटाचा दिग्दर्शक पुन्हा आपला कॅमेरा चापेकरांच्या घरावर रोखतो. घरामध्ये चापेकरबंधूच्या तीन विधवा पत्नी डोक्याचं मुंडन करून, तांबडं वस्त्र नेसून अतिशय उद्विग्न मनाने बसलेल्या दाखवल्या आहेत. जर दिग्दर्शकाला चापेकरबंधूंची शौर्यगाथा दाखवायची होती—तसं त्यानं वेळोवेळी टाहो फोडून सांगित-लंही आहे— तर शौर्यगाथेच्या वर्णनात हा भाग बसण्यासारखा नाही. कारण जे वीरपुरुष स्वतःच्या कुटुंबापलीकडे जाऊन काही काम *करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या कुटुंबाची अशा तऱ्हेने वाताहत* होणं अपेक्षितच असतं. त्यामध्ये मुद्दाम फोकस करण्यासारखं काही नाही. म्हणजे उद्या या दिग्दर्शकानी तानाजीवर चित्रपट काढला तर त्याच्या शौर्य व स्वामिनिष्ठेपेक्षाही त्याची विधवा झालेली पत्नी आणि आता माझ लग्न कोण करणार, असं धाय मोकलून रडणारा रायबा या दिग्दर्शकाला आधी दिसेल ! यावर कोणी असे म्हणेल की, *त्यात वावगं काय आहे ? आम्हाला जे दिसलं, जे भावलं ते आम्ही* दाखवलं. वादासाठी हे म्हणणं ठीक आहे; पण लग्नसमारंभात निघालेल्या मिरवणुकीपेक्षा अंतकालच्या मिरवणुकीस जास्त महत्त्व देणाऱ्या वीरपुरुषांची व्यक्तिमत्त्वं रंगवता रंगवता एकदम असं काही तरी सामाजिक आशय असलेलं दृश्य पुढे आणल्यानं रसभंग होतो एवढं किमान प्राथमिक ज्ञान या दिग्दर्शकाकडून अपेक्षित होतं; पण आज-काल *असं काही दाखवल्याशिवाय आधुनिक, पुरोगामी,* सामाजिक दृष्टिकोन असलेला क्रांतिकारी दिग्दर्शक असले विशेषण मिळणार नाही या चिंतेमुळं चित्रपटातील एकसंध रसनिष्पत्तीकडे पूर्ण दुर्लक्ष झाल्यासारखं वाटतं. अर्थात एकूण चित्रपटातच कुठेही हेतुतः जाणीवपूर्वक दिग्दर्शन केलेलं क्वचितच आढळतं. त्यामुळं चित्रपटाचा शेवटही त्याला अपवाद कसा असेल ?

तेव्हा रँडवधाशी संबंधित मूळ चापेकर–प्रकरण हे असं आहे. हे मूळ स्वरूप व चित्रपट दोन्हीही समांतरपणे वाचकासमोर ठेवण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे. यातून वाचकांनीच चित्रपट आणि चापे-कराचं व्यक्तिमत्त्व याचा कस एकत्रितपणे व स्वतंत्रपणेही अजमा-वयाचा आहे.

मराठी चित्रपट एका विशिष्ट पातळीपलीकडे जातच नाही, अशी ओरड आपल्याकडे सर्वच समीक्षक अधून-मधून करत असतात. त्याचे माझ्या मते मुख्य कारण आपल्या दिग्दर्शकामध्ये असलेला कमालीचा उथळपणा हे आहे. '२२ जून १८९७' चेच उदाहरण पहा. निर्माता दिग्दर्शकानं अनेक खाजगी व प्रगट मुलाखतीमध्ये चापेकरावरील चित्रपट का काढावासा वाटला, असं विचारल्यावर असं सांगितलं की, मी पूर्वीच चापेकरांच्या जीवनावरील एक पुस्तक वाचलं होतं आणि तेव्हाच त्यांच्यावर एक चित्रपट काढण्याचं मी मनाशी ठरवून टाकलं. या महाशयानी ही प्रतिज्ञा करत असतानाच किमान चापेकराचं आत्मवृत्त वाचण्याचीही प्रतिज्ञा केली असती तर आज त्याच्या चित्रपटात दिसणाऱ्या वर नमूद केलेल्या ढोबळ चुका राहिल्या नसत्या. कारकीर्दीला सुरुवात करत असतानाच निर्माते-दिग्दर्शकांनी दाखवलेली ही बेपर्वाई व त्यातून निर्माण झालेला चुकीच्या माहितीवर किंवा अज्ञानावरच आधारित असलेला चुकीची दिशा व दृष्टिकोन असलेला हा अत्यंत भोंगळ आणि उथळ चित्रपट प्रेक्षकाची घोर निराशा करतो.

रँडचा वध हे या चित्रपटाचं मुख्य केंद्र असल्यामुळं दामोदर चापेकर किंवा लोकमान्य टिळक यांचं जीवनदर्शन इथं घडावं अशी अपेक्षा कोणताही सुज्ञ प्रेक्षक करणार नाही; पण जे दाखवलं जाईल ते इतिहासाशी इमान राखून एकसंधपणे समोर येईल एवढीदेखील हमी दिग्दर्शकांनी देऊ नये काय?

मग शेवटी प्रश्न निर्माण होतो की हा चित्रपट आहे तरी काय? एका वाक्यात सांगायचं झालं तर ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील हा एक अनैतिहासिक, अवास्तव व स्वप्नरंजनात्मक तुकडेपट आहे! यामध्ये रँडचा खून करणाऱ्या चापेकरबंधूंची शौर्यगाथा दाखवलेली नाही. एका माथेफिरूने वेडाच्या भरात केलेलं ते एक व्यर्थ बलिदान आहे. चापेकर कसे असावेत हे ज्यांना जाणून घ्यायचं असेल त्यांनी चापेकरांचं आत्मवृत्त वाचावं! चापेकर कसे नसावेत हे ज्यांना पहायचं असेल त्यांनी '२२ जून १८९७' हा चित्रपट पहावा आणि एखादा बाँडपट ज्याप्रमाणे आपण रिकाम्या डोक्याने पाहून परत येतो तसं परत यावं!!

शेवटी एक–दोनच गोष्टी सांगून ही थोडीशी लांबलेली चर्चा संपवतो. चित्रपटात काही ठिकाणी त्या वेळच्या ब्राह्मणांबद्दल अनुदार उद्गार आहेत. त्या काळातील 'टाइम्स ऑफ इंडिया' सारख्या इंग्रजी वर्तमानपत्रांतून पुण्याच्या ब्राह्मणांचंच हे कारस्थान असलं पाहिजे असा संशय वारंवार व्यक्त केला जात होता. लोकमान्य टिळकांनी 'केसरी'मधील 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' या गाजलेल्या अग्रलेखात या शंकेला समर्पक उत्तर दिलं आहे. टिळक लिहितात–

'ज्या पुण्यांतील ब्राह्मणांवर सरकारचा येवढा मोठा कटाक्ष आहे त्यांत किती फूट, किती पक्ष, किती फळ्या अथवा मतभेद आहेत याची आमच्या परकीय सरकारास अद्याप कल्पनाही झाली नाही असे त्यांच्या वर्तनावरून दिसून येते. शे–दोनशे तर राहू द्याच, पण पाच–पंचवीस ब्राह्मणलोक एखादे चांगले काम पुण्यात जुटीने करतील अशी आमची स्थिती नाही; मग खुनासारख्या भयंकर गुन्ह्यासंबंधी तर बोलावयासच नको!'

अर्थात चित्रपटातील फक्त संवादच नव्हे तर एकूण चित्रपटच त्या काळातील 'केसरी'सारख्या देशभक्त वर्तमानपत्रांपेक्षा 'टाइम्स ऑफ इंडिया' सारख्या इंग्रजांची तरफदारी करण्यात धन्यता मानणाऱ्या व एतद्देशीयांना क्षुद्र लेखणाऱ्या वर्तमानपत्रांच्या ॲंगल: मधून घेतल्यासारखा वाटतो.

या ठिकाणी 'जुनून' या गाजलेल्या चित्रपटाचं उदाहरण द्यावंसं वाटतं. १८५७ च्या स्वातंत्र्य–युद्धावरील हा चित्रपट; पण सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वीच्या तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक ताण–तणाव या चित्रपटात सर्व बारकाव्यांसह उभे केलेले आहेत. शिवाय आजच्या तथाकथित सिनेइंटेलेकच्युअलसना हवी असणारी तटस्थताही (alienation) 'जुनून'मध्ये आहेच.

एक अतिशय निराळ्या, इतिहासाच्या गर्तेत लोप पावणाऱ्या विषयाला हात घातल्याबद्दल चित्रपटनिर्माते अभिनंदनास पात्र आहेत; पण असाच दुसरा एखादा चित्रपट काढताना त्यांनी या मुद्द्यांची नोंद घेतल्यास चित्रपटाच्याच सर्वांग सुंदरतेस हातभार लागेल. □


# अशक्य वाटणारी परदेश सफर बंडोपंतांनी सहज शक्य करून दाखविली...



आयुष्यांत कधीतरी परदेश प्रवास घडावा ही बंडोपंतांची तीव्र इच्छा. यात्रा कंपनीची जाहिरात वाचल्यापासून आपण परदेशी कधी जातो असे त्यांना होऊन गेले. संधी तर आली होती पैशाची व्यवस्थाही झालेली होती. मात्र हे सगळं त्यांनी गुपीत ठेवले होते.

साहेबांच्या टेबलावर परदेशी जाण्यासाठी रजा' अशा शिर्षकाचा त्यांनी अर्ज केल्यावर साहेबांसह सर्व चाट पडले. आपल्यासारखीच वेताची परिस्थिती असतानां बंडोपंतांना ही संधी मिळाल्याचे पाहून सर्वाना हेवा वाटला. त्यानां निरोप समारंभ झाला. भाषणे झाली. उत्तरादाखल केलेल्या भाषणांत त्यांनी सांगितले.



"मित्रहो, मी परदेशी जातो याचे कुतुहल तुमच्या चेहऱ्यावर आहे हे मी जाणतो. मलाही इतके पैसे जमविणे अवघडच होते. परंतु मी गेली १० वर्षे सांगली बँकेच्या रिकरिंग डिपॉझिटमध्ये या सफरीसाठी नियमित पैसे भरीत आहे. नुकतेच माझ्या हातात मुद्दल व व्याज मिळून मोठी रक्कम जमा झाली. आणि सांगली बँकेनेही माझ्या परदेशगमनासाठीं लागणाऱ्या विदेशी चलनाची त्वरित तरतूद केली. थोडक्यांत काय जबरदस्त इच्छा असली की मार्ग दिसतो"

**पैशाच्या समस्येला बचतीशिवाय पर्याय नाही.**

आपल्या उत्कर्षातील साथीदार

**दि सांगली बँक लि.**

रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एम. आर. रणदिवे

Parkerson 8075

भाषणावरील चर्चेतसुद्धा शरद पवारांनी अनेक विधायक सूचना केल्या. शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याच्या संदर्भातसुद्धा रिझर्व्ह बँक कोणती भूमिका घेऊन अडथळा निर्माण करू शकेल याची स्पष्ट कल्पना शरद पवारानी आपल्या भाषणातून दिली. मुख्यमंत्री व अर्थमंत्री उभयताना शरदरावांच्या सूचनाची योग्य दखल घ्यावी लागली. मंत्र्याची सदनाच्या कामकाजाबद्दलची अनास्था, जळगाव दंगल वा इंदिरा काँग्रेसचा विधानभवनावरील मोर्चा, कोणताही विषय असो विरोधी पक्षनेत्याचा आब कायम ठेवूनच शरदरावानी भाषण केले. इंदिरा काँग्रेसच्या मोर्चासारख्या वादग्रस्त प्रश्नावर विरोधी पक्षाचे सर्व आमदार एकाच वेळी उभे राहून गोंधळात भर घालीत असतानाच शरद पवार मात्र शांतपणे बसून होते. विरोधी पक्षनेतेपदाचा आब म्हणतात तो ह्याच ! एकूणच प्रमुख विरोधी पक्ष म्हणून स्वतःच्या पक्षाला जास्तीत जास्त assert करण्याकडे अर्स काँग्रेसचा कल दिसून येत होता. विधानसभेच्या उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत मागे एकदा सर्वमान्य झालेले सूर्यकान्त डोंगरे याचे नाव न स्वीकारता स्वतःच्या पक्षाचे शंकरराव जगताप याच्या नावाचा आग्रह धरण्यामागे अर्स काँग्रेसची हीच भूमिका दिसून आली. मात्र सभागृहातील कामकाजात अन्य विरोधी पक्षाशी सहकार्याचेच धोरण अर्स काँग्रेसने घेतल्याचे दिसून येत होते.

शरद पवार यांच्याव्यतिरिक्त सर्वश्री गोविंदराव आदिक, प्रतापराव भोसले, सूर्यभान गडाख, मालोजीराव मोगल, ईश्वरलाल जैन इ. अर्स काँग्रेसीय आमदारानी कामकाजात उत्साहाने भाग घेतला. तरुण व नवागत आमदारांपैकी सूर्यकांत पालांडे व राम कांडगे यानी चागलीच चमक दाखविली. माजी मंत्री श्रीपतराव बोंद्रे मात्र फारसे सक्रिय दिसले नाहीत.

विधानसभेतील दुसऱ्या क्रमांकाच्या विरोधी पक्षाची—जनता पक्षाची—कारकीर्दच पक्षातराने सुरू झाली. अधिवेशनाच्या सुरुवातीसच या पक्षाचे सोलापूरचे एक सदस्य इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करते झाले. आज विधानसभेत या पक्षाचे १६ सदस्य आहेत व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बबनराव ढाकणे त्याचे नेतृत्व करीत आहेत. बबनरावाना नेतृत्वाचा वकूब आहे पण ते फारसे अनुभवी नाहीत. त्यातच सभागृहात कटाक्षाने हजर राहण्याबाबतही ते फारसे दक्ष नव्हते. त्यामुळे जनता पक्षाच्या नेत्याची दुसऱ्या क्रमांकाचा विरोधी नेता म्हणून प्रतिमा उभी राहू शकली नाही जनता पक्षात समाजवाद्यांचे पाच आमदार आहेत. त्यांपैकी निहाल अहमद व गुलाबराव पाटील सोडले तर बाकी कोणीही कामकाजात खूप स्वारस्य दाखवीत नव्हते. माजी मंत्री जगन्नाथ जाधव पुढच्या रांगेतील जागा अडवून होते; पण असे असूनही सहसा त्यानी मौन सोडले नाही. माजी सभापती प्राणलाल व्होरा सुद्धा सुरुवातीच्या दिवसात विधानसभेत हजर होते पण नंतर मात्र त्यानी क्वचितच दर्शन दिले. गुलाबराव पाटील हा पहिल्यापासूनच एक गमत्या माणूस ! आपल्या घाटदार खानदेशी भाषेत ते विधानसभेच्या एरवी रुक्ष वाटणाऱ्या कामकाजात हास्य—विनोदाची चांगली भर घालतात. ते, तसेच शे. का. प. चे दत्ता पाटील आणि इंदिरा काँग्रेसचे आमदार यांच्यात थट्टा—मस्करी आणि मनोरंजक Comments ची देवाणघेवाण नेहमीच सुरू असते. पुण्याच्या 'सोबत' साप्ताहिकाविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव आणण्यात गुलाबरावांचाही पुढाकार होता. जनता पक्षाच्या अन्य आमदारांपैकी हरिभाऊ महाले, किसनराव बाणखेले, अशोक साबळे व विधानसभेतील 'पुराणपुरुष' फ्रे मा. पिंटो चांगले सक्रिय होते.

### भाजप क्रमांक दोन

विधानसभेत भारतीय जनता पक्षाचे १४ सदस्य आहेत व त्यांचे संख्याबळ कमी असले तरी एक गट म्हणून सर्वाधिक सक्रिय असलेला हाच पक्ष आहे धारदार व निश्चित स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात पटाईत असलेले हशू अडवानी या गटाचे नेते आहेत. राम नाईक व राम कापसे यांच्या जोडीला अण्णा जोशीसारखा खंदा संसदपटू आल्याने या गटाची गुणवत्ता अधिकच वाढली आहे. या गटाचे उपनेते व आमगावचे आमदार प्रा. म. सू. शिवनकर यानीही या अधिवेशनात प्रशंसनीय चमक दाखविली. मोठ्या जागरूकपणे जनहिताचे अनेक प्रश्न विधानसभेसमोर आणण्यात हशू अडवानींना त्यानी समर्थपणे साथ दिली. मुंबईचे प्रेमकुमार शर्मा आणि केवळ लोकहिताच्या कामाच्या जोरावर बीड जिल्ह्यातून निवडून आलेले गोपीनाथ मुंढे ह्या उभयता तरुण आमदाराकडून खूप आशा बाळगावी अशीच त्याची एकूण कामगिरी होती. या गटाचे प्रा. राम कापसे याचे शिक्षणखात्याच्या मागण्यांवरील भाषण चांगलेच गाजले. गिरगावातील दंगलीबाबत सौ. जयवंतीबेन मेहतानी हकीकत सांगतानाचे जे भाषण केले तेही उल्लेखनीय होते. जयवंतीबेनच्या तोंडून तो 'आँखो देखा हाल' ऐकताना सारे सभागृह सुन्न झाले होते !

राज्यविधानसभेत शेतकरी कामगार पक्षाचे फक्त ९ सदस्य आहेत; पण भा. ज. प. प्रमाणेच अनेक अनुभवी व गुणी आमदाराचा त्यात समावेश आहे. माजी खासदार, पनवेलचे दि. बा. पाटील या गटाचे नेते आहेत व ही जबाबदारी या अधिवेशनात त्यांनी मोठ्या समर्थपणे सांभाळली. माजी मंत्री गणपतराव देशमुख कमी वेळा बोलतात; पण बोलतात तेव्हा सरकारसमोर नेमके प्रश्न उभे करणारे तडाखेबंद भाषण करतात. या पक्षाची एक मुलुखमैदान तोफ म्हणजे किसनराव देशमुख ! उपहासगर्भ शैलीत सरकारची भंबेरी उडविण्यात त्यांचा हातखंडा आहे. विरोधी पक्षातील अन्य आमदारात कम्युनिस्ट पक्षाचे मुदाम देशमुख व मार्क्सवाद्यांचे जिवा पाडू गावित यांनी चागली कामगिरी बजावली. विशेषतः आदिवासींच्या खातेफोडीच्या समस्येवरील गावित याचे भाषण प्रभावी होते.

विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेतेपद जनता पक्षाचे प्रा ग. प्र. प्रधान याच्याकडे आहे. विधानपरिषदेत या पक्षाचे इन—मीन तीन आमदार असताना प्रा. प्रधानांकडे नेतृत्वाची जबाबदारी आली यामागे दोन कारणे आहेत. प्रा. प्रधानासारखा अजातशत्रू

# गरिबी आणि सामाजिक विषमतेविरुद्ध लढा नव्या महाराष्ट्र सरकारचे धोरण



- अल्पभूधारकांची ४९ कोटी रुपयांची कर्जमुक्ती.
- ५८,००० कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सहकारी बँकेला ८·१५ कोटी रुपयांची भरपाई.
- २ लाख ५०हजार शेतकऱ्यांना लाभदायक अशी २३ कोटी रुपयांच्या कर्जाची पुनर्आखणी.
- लहान शेतकऱ्यांना खताच्या वाढलेल्या किंमतीवर अर्थ सहाय्य.



- ग्रामीण भूमिहीनांच्या घरकुलासाठी १५०० रु. ऐवजी आता २००० रु.
- पूर्वी १५० रु. पर्यन्त किंमतीची घरे मिळाले. भूमिहिनही या योजनेस पात्र.
- घरकुल योजना १५,००० पर्यन्त लोकवस्तीच्या 'क' वर्गीय नगरपालिकांनाही लागू




- तारण देऊ न शकणाऱ्यांना प्राप्तीदायक रोजगार मिळावा म्हणून कर्ज पुरवठा.
- सुशिक्षित बेरोजगारासाठी असलेल्या बीज भांडवल सहाय्य योजनेत बदललेल्या परिस्थितीनुरुप फेरबदल.



- विशिष्ट भागातील औद्योगिक घटकांना लागू असलेली भांडवल सवलतीची योजना अविकसित भागातील सर्व औद्योगिक घटकांना लागू.
- तालुका-पंचायत समिती क्षेत्रात जाणाऱ्या औद्योगिक प्रकल्पांना अधिक सवलती.



- येत्या पांच वर्षात ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा निर्धार.
- योजनेअन्तर्गत चालू वर्षात ४५७९ खेड्यांना पाणी-पुरवठा.
- झोपडपट्टी रहिवाशांचे जीवन सुधारण्यावर भर.

**हे साध्य होण्यासाठी २० कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी.**

K. CHANDU

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ द्वारा प्रकाशित.

आणि अभ्यासू आमदार जनता व मित्रपक्षाना सर्वमान्य होण्यासारखाच होता. त्यामुळे शे. का. प., अर्स कॉंग्रेस इ. नी एकत्र येऊन प्रा. प्रधान हे नेते व सौ. प्रभा राव उपनेत्या अशी वाटणी करून घेतली. हे तीन पक्ष जर एकत्र आले नसते तर डझनभर सदस्याचा भा. ज. प. प्रमुख विरोधी पक्ष ठरला असता व ग. भा कानिटकर नेते झाले असते. हे होऊ द्यायचे नव्हते व म्हणूनच उर्वरित तिन्ही पक्ष एकत्र आले. विधिमंडळात विरोधी पक्षानी एकत्र येण्यात नवीन असे काहीच नाही; पण मग भा. ज. प. चे वावडे कशासाठी ?

विधानपरिषदेतील विरोधकांच्या एकूण कामगिरीकडे पाहता प्रा. ग. प्र. प्रधानाबरोबरच एन. डी. पाटील, राजाराम बापू इ. माजी मंत्र्यांनी कामकाजात प्रभावीपणे भाग घेतला. पुरोगामी आघाडीचे नवनिर्वाचित सदस्य अण्णासाहेब पाटील, भाई बंदरकर यानीही चागली चमक दाखविली. राष्ट्रीय आघाडीचे नेते ग. भा. कानिटकर तसेच मधू देवळेकर, विनोद गुप्ता, कुमद रांगणेकर इ. चा सहभाग उल्लेखनीय होता. सभापती रा. सू. गवई यांनीसुद्धा अनेक वेळा देवळेकर आदींच्या मुद्देसूद प्रतिपादनाची योग्य दखल घेऊनच निर्णय दिले आहेत.

### उणीवा-अपेक्षा

उभय सभागृहातील विरोधी पक्षाच्या एकूण कामगिरीचा आढावा घेताना काही मुद्दे ठळकपणे जाणवतात. विधानसभेत तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या घटनेबाबत स्थगनप्रस्ताव किती वेळा मांडायचे याचा विरोधकांनी विचार करायला हवा. एकाच दिवशी डझन-दीड डझन स्थगनप्रस्ताव आल्यावर या शस्त्राची धार बोथटच होणार ! भा. ज. प. च्या अण्णा जोशीनी तर इतके स्थगनप्रस्ताव मांडले की आमच्या एका पत्रकारमित्राने त्यांचे नामकरण 'स्थगण्णा जोशी' असेच केले आहे ! तीच गोष्ट हरकतीच्या मुद्द्यांबाबत. सभागृहाच्या कामकाजात काही आक्षेपार्ह आढळले तर हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा असतो. पण या मुद्द्याच्या निमित्ताने उभे रहायचे, बोलण्याची संधी घ्यायची व एक भाषणच ठोकायचे ही पद्धत योग्य नाही. शेवटी शेवटी सभापतींनीही या पद्धतीला आक्षेप घेतला व तो योग्यच होता. विरोधी बाजूचे सर्वच पक्ष आपण परस्परांशी सभागृहातर्गत सहकार्याला तयार असल्याचे सांगतात; पण प्रत्यक्षात त्यांच्या कामाच्या पद्धतीत व्यवस्थित मेळ दिसून आला नाही. सुरुवातीस शोकप्रस्तावाच्या वेळी सर्व विरोधी नेत्यांनी कै. संजय गांधींच्या नावाचा उलेख हेतुत: टाळला पण भा. ज. प. च्या हशू अडवानींनी मात्र संजय गांधींचाही सविस्तर उल्लेख केला तर नंतर झालेल्या राज्यसभा व विधानपरिषदेच्या निवडणुकीत अन्य सर्व विरोधी पक्ष एकत्र आले व भा. ज प. ला एकटे पाडण्यात आले.

राज्य विधिमंडळाच्या या अधिवेशनात बॅ. अंतुले यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारचा कस लागायचा होता व त्यामुळे सर्व राजकीय निरीक्षक मोठ्या कुतूहलाने सरकारच्या कामगिरीकडे पहात होते. चाळीस दिवसाच्या या अधिवेशनामुळे अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. एका मराठी पत्रकारानेच म्हटल्याप्रमाणे बॅ. अंतुले याचे नेतृत्व खालून वर आलेले नाही त्यामुळे स्वतःचे नेतृत्व रुजवायचे असेल तर त्याना संघटनात्मकदृष्ट्या जरी नाही तरी प्रशासनिकदृष्ट्या कार्यक्षम राहून प्रभाव निर्माण करण्याशिवाय गत्यंतर नाही. हे जर साधायचे असेल तर 'हरून अल् रशीद' सारखा फेरफटका किंवा कॅन्सरवरील औषधाची विधिमंडळातील घोषणा इ. युक्त्याचा उपयोग होणार नाही. आज विश्वासू व कार्यक्षम सहकाऱ्यांची एक Team खुद्द पंतप्रधानानाही उभी करता आलेली नाही व इकडे अतुल्यांनाही आज तरी ते जमलेले नाही. मंत्रिमंडळ बनवितानाही याचा फारसा विचार झालेला नाही. अन्यथा केवळ गुजराती प्रतिनिधी हवा म्हणून प्रमिलाबेन याज्ञिकांचा मंत्रिमंडळात समावेश झाला नसता याज्ञिकबाईंप्रमाणेच कमळे गुरुजी, अजहर हुसेन प्रभृतीचा विरोधकांपुढे अजिबात टिकाव लागत नाही. यामुळे सरकारची तर शोभा होतेच; पण आमदारांचे व पुढे कार्यकर्त्यांचेही नीतिधैर्य ढासळण्यात याचे पर्यवसान होते, तेव्हा मंत्रिमंडळाची पुनर्रचना करताना अकार्यक्षम मंत्र्यांना वगळले पाहिजे व प्रतिभा पाटील यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तींना योग्य स्थान दिले पाहिजे.

नव्या सरकारच्या कारकीर्दीत पहिले अधिवेशन संपते न संपते तोच मुख्यमंत्र्याविरुद्ध बंडाची कुणकुण ऐकू येऊ लागली आहे. प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या आधारे लगेचच अंतुले सरकारचे आसन डळमळित आहे असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही हे खरेच! संघटनात्मकदृष्ट्या पाय रोवलेली एखादी व्यक्ती मुख्यमंत्रीपदी न ठेवण्याची इंदिरा गांधींची कार्यशैली पाहता बॅ. अंतुले यांच्या संघटनात्मक उणीवा हीच त्यांची 'जमेची बाजू' आहे, हेही खरेच; पण असे असले तरी प्रशासनिक कार्यक्षमता व तिचा प्रभाव ही एक वेगळीच बाब आहे व तिचे महत्त्व नाकारणे परवडण्यासारखे नाही. शेवटी Government that works हे प्रत्यक्षात राहू द्या, पण विधानसभेत दाखविण्याचा तरी प्रयत्न होणार आहे की नाही ? का एका विरोधी आमदाराने म्हटल्याप्रमाणे Opposition that works and Government that apologises हेच यापुढेही खरे ठरणार आहे ? □



आवृत्ती संपत आली....

**जनांचा प्रवाहो चालिला**

लेखक : विनय हर्डीकर

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०


देशाच्या एकात्मतेचे
सूत्र काय ?
"मुख्यत: लोकांना देशाबद्दल
वाटणारं प्रेम आणि त्यासाठी झटण्याची
आणि त्याग करण्याची तयारी.
अर्थात, यात केवळ परहिताची भावना
नसते. कारण प्रत्येक व्यक्तीला हे माहित
असतं कीं त्याच्या देशाच्या भवितव्याशी
त्याचं हित निगडित असतं."
— इंदिरा गांधी
आपल्या
स्वातंत्र्याच्या
33 व्यां
वर्धापन दिनीं
आपण सी. आर. दास यांच्या या
अमर उद्गारांचे स्मरण करु या :
"भारत नामशेष झाला
तर जगेल कोण?"
आमचा केवळ एकच उद्देश
एका बलवान आणि आत्मविश्वासी
भारताची उभारणी
त्यासाठी आपण एकजुटीनें काम करु या